पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी
मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 10 ● 16 मे 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# मैं देश नहीं झुकने दूंगा



## अध्यक्षीय मनोगत

# भारतमाता की जय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय सैन्याने पाकिस्तानला जबरदस्त धडा शिकवला. पहलगाम येथे २६ निरपराध पर्यटकांना धर्म विचारून ठार करणाऱ्या दहशतवाद्यांचे पाकिस्तानमधील प्रमुख अड्डे भारतीय लष्कराने उध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले. या यशाबद्दल मी प्रदेश भारतीय जनता पार्टीतर्फे भारतीय सैन्यदलाचे अभिनंदन करतो. ही लष्करी कारवाई ऐतिहासिक झाली. भारतीय सैन्यदलांनी ठरविल्यानंतर पाकिस्तानमधील कोणतेही ठिकाण त्यांच्या हल्ल्यापासून वाचू शकत नाही, हे सिद्ध झाले. खरे तर भारताची कारवाई दहशतवाद्यांच्या विरोधात होती. बहावलपूर येथे जैश ए मोहंमदचे मुख्यालय तर मुरदिके येथे लष्कर-ए-तैयबाचा अड्डा होता. पाकिस्तानातील हे दोन्ही तळ भारतीय सैन्याने अचूक उध्वस्त केले. असे एकूण नऊ दहशतवादी अड्डे उध्वस्त केले. मुंबईतील दहशतवादी हल्ल्यासह अनेक कारवायांचे नियोजन या ठिकाणी झाले आणि दहशतवाद्यांचे प्रशिक्षणही येथे झाले. ही जणू दहशतवाद्यांची विद्यापीठेच होती. या हल्ल्यात आपले किती नुकसान झाले याची कबुली जैश-ए-मोहंमदचा संस्थापक मौलाना मसूद अजहरने दिली. भारतीय सैन्याने दहशतवाद्यांवर हल्ला केल्यानंतर पाकिस्तानी लष्कराने भारतावर हल्ला करण्याचे अनेक प्रयत्न केले. पण भारतीय सैन्याने पाकिस्तानचा प्रत्येक हल्ला परतवून लावला. हवाईदलाच्या क्षेपणास्त्रांनी व लढाऊ विमानांनी या कारवाईत मोलाची कामगिरी केली. पाकिस्तानचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हवेतच निकामी करून भारताने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले. पाकिस्तानमधील हवाईदलाच्या तळांवर अचूक हल्ले करून भारतीय सैन्याने पाकिस्तानला दाखवून दिले की, त्या देशातील कोणत्याही ठिकाणावर भारत हवा तेव्हा हल्ला करू शकतो. अखेर पाकिस्तानने गयावया केल्यानंतर भारताने कारवाई थांबविण्याचा निर्णय घेतला. शौर्य आणि संयम या दोन्हीचे दर्शन भारताच्या भूमिकेतून दिसले. भारताने या कारवाईत अत्याधुनिक युद्धतंत्रात देश किती पारंगत झाला आहे, हे जगाला दाखवून दिले. भारतीय शस्त्रांस्त्रांचे महत्वही सिद्ध झाले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या अकरा वर्षात भारताची संरक्षण सिद्धता वाढविण्यासाठी जे पद्धतशीर प्रयत्न झाले त्याचा लाभ आता दिसून आला. पहलगामच्या हल्ल्यात ज्या महिलांचे कुंकू पुसले गेले, त्यांना न्याय मिळाला आणि देशात सर्वत्र 'भारतमाता की जय', असा जयजयकार झाला. पतीच्या अकाली निधनानंतर खंबीरपणे राज्य करणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जयंती वर्षातच ऑपरेशन सिंदूर यशस्वी व्हावे हा एक आगळा योगायोग आहे. काशीसह अनेक महत्त्वाच्या मंदिरांचा जीर्णोध्दार करणाऱ्या अहिल्यादेवी या सुधारणावादी राज्यकर्त्या होत्या. उत्तम प्रशासन, जनसामान्यांबद्दल कळवळा, विकासाला चालना आणि निस्पृह नेतृत्व ही त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या स्मरणार्थ भाजपा महायुती सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर केले आहे. त्यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण सर्व कार्यकर्त्यांनी करणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्यामुळे आज एकविसाव्या शतकातही आपल्याला लोककल्याणकारी राज्य चालविण्याची प्रेरणा मिळत आहे. मी प्रदेश भाजपातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवींना विनम्र आदरांजली अर्पण करतो.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

मैं देश नहीं झुकने दूंगा ०४



पाकिस्तानचे नाक कापले ०७


होय, आम्हाला मोदी सरकारचा अभिमान आहे ०९


रावळपिंडीपर्यंत ब्रह्मोसचा आवाज गेला: राजनाथ सिंग १२



जय जवान १४


लोककल्याणाला समर्पित जीवन २०


हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# मैं देश नहीं झुकने दूंगा

● नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> भारताने केवळ आपली लष्करी कारवाई पुढे ढकलली आहे. जर पाकिस्तानने पुन्हा दहशतवादी कारवाया किंवा लष्करी दुःसाहस दाखवले तर आम्ही त्याला जशास तसे उत्तर देऊ. आपल्याला सतत सतर्क राहावे लागेल, सज्ज राहावे लागेल. आपण शत्रूला सतत जाणीव करून देत राहावे की हा एक नवीन भारत आहे.

**ऑपरेशन** सिंदूर ही सामान्य लष्करी मोहीम नव्हे तर भारताचे धोरण,हेतू आणि निर्णायक क्षमतेची त्रिवेणी आहे.भारत ही भगवान बुद्धांचीही भूमी आहे आणि गुरु गोविंदसिंह जी यांचीही भूमी आहे. गुरु गोविंदसिंह जी यांनी म्हटले होते, सवा लाख से एक लड़ाऊं, चिड़ियन ते मैं बाज़ तुड़ाऊं, तबै गुरु गोबिंद सिंह नाम कहाऊं। अधर्माचा नाश आणि धर्म स्थापनेसाठी शस्त्र उचलणे ही आपली परंपरा आहे. म्हणूनच आपल्या भगिनी, कन्या यांचे कुंकू पुसले गेले तेव्हा आम्ही दहशतवाद्यांच्याच आश्रयस्थानी घुसून त्यांचा कणा मोडला. ते भेकडाप्रमाणे लपूनछपून आले होते,मात्र ते हे विसरले की त्यांनी ज्यांना आव्हान दिले आहे ते हिंदुस्तानचे सैन्य आहे. आपण त्यांच्यावर समोरून हल्ला केला, दहशतवादाचे मोठे अड्डे जमीनदोस्त केले, ९ दहशतवादी तळ उध्वस्त केले, १०० हून अधिक दहशतवाद्यांना मारले,दहशतवादाच्या सूत्रधारांना आता समजले आहे की भारताकडे वाकड्या नजरेने बघण्याचा एकच परिणाम आहे– विनाश! भारताच्या निर्दोष लोकांचे रक्त सांडण्याचा एकच परिणाम होईल– विनाश आणि सर्वनाश! ज्या पाकिस्तानी सैन्याच्या भरवशावर हे दहशतवादी अवलंबून होते, त्या पाकिस्तानी सैन्यालाही भारताचे हवाईदल, भारताच्या नौदलाने धूळ चारली. आपण पाकिस्तानी सैन्यालाही दाखवून दिले की पाकिस्तानमध्ये असे कोणतेही ठिकाण नाही जिथे दहशतवादी निर्वेधपणे राहतील. आम्ही त्यांच्या घरात घुसून मारू आणि बचावाची एक संधीही देणार नाही. आमची ड्रोन्स, आमची क्षेपणास्त्रे, यांच्या विचारानेच पाकिस्तानची झोप उडाली असेल.



**कौशल दिखलाया चालों में, उड़ गया भयानक भालों में।**
**निर्भीक गया वह ढालों में, सरपट दौड़ा करवालों में।**

या ओळी महाराणा प्रताप यांच्या चेतक या प्रसिद्ध घोड्याबद्दल लिहिल्या गेल्या आहेत, मात्र आधुनिक भारतीय शस्त्रांसाठीही त्या चपखल बसतात.

ऑपरेशन सिंदूरमुळे आपण देशाचे आत्मबल वाढवले आहे, देशाला एकतेच्या धाग्याने घट्ट बांधले आहे आणि आपण भारताच्या सीमांचे रक्षण केले आहे, भारताच्या स्वाभिमानाला नवी उंची दिली आहे.

आपण अभूतपूर्व, अकल्पनीय, अप्रतिम कामगिरी केली आहे. आपल्या हवाई दलाने पाकिस्तानमधील खोलवर दहशतवादी तळाना लक्ष्य केले. केवळ २०–२५ मिनिटांत सीमापार लक्ष्याचा वेध घेणे, अचूक वेध घेणे हे केवळ आधुनिक तंत्रज्ञान युक्त आणि कसलेले सैन्यच करू शकते. आपला वेग आणि अचूकता पाहून शत्रू



गोंधळून गेला. आपली अवस्था विदीर्ण कधी झाली हे त्याला कळलेही नाही. पाकिस्तानमधील दहशतवादी मुख्यालयावर हल्ला करणे आणि दहशतवाद्यांना यमसदनी पाठवणे हे आमचे उद्दिष्ट होते. पण पाकिस्तानने आपल्या प्रवासी विमानांना अग्रभागी ठेवून जी खेळी केली तेव्हाचा तो क्षण किती कठीण असेल याची मी कल्पना करू शकतो, प्रवासी विमान दिसत असताना अतिशय काळजीपूर्वक आणि सावधगिरीने त्या प्रवासी विमानाला कोणतीही हानी न पोहोचवता तुम्ही हवाई तळ ध्वस्त करून चोख प्रत्युत्तर दिले, त्याचा मला अभिमान आहे. मी अभिमानाने सांगू शकतो की तुम्ही सर्वांनी तुमचे ध्येय पूर्णपणे साध्य केले आहे. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे आणि त्यांचे हवाई तळ उध्वस्त झालेच, त्याचबरोबर त्यांचे वाईट हेतू आणि दुःसाहस दोन्हीही पराभूत झाले.

ऑपरेशन सिंदूरमुळे निराश झालेल्या शत्रूने या हवाईतळावर तसेच आपल्या अनेक हवाईतळांवर हल्ला करण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला. त्यांनी आम्हाला वारंवार लक्ष्य केले, परंतु पाकिस्तानचे निष्फळ, विकृत हेतू प्रत्येकवेळी फोल ठरले. पाकिस्तानचे ड्रोन, त्यांचे यूएव्ही, पाकिस्तानची विमाने आणि त्यांची क्षेपणास्त्रे, हे सर्व आमच्या मजबूत हवाई संरक्षणाने नष्ट केले. देशातील सर्व हवाई तळांच्या नेतृत्वाचे, भारतीय हवाई दलाच्या

## लष्कराचा सन्मान करणारा पंतप्रधान

आदमपूर येथील हवाई तळ उध्वस्त केल्याचा दावा पाकिस्तानतर्फे करण्यात आला होता. त्याच तळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ मे रोजी सैन्यदलाच्या जवानांशी संवाद साधला. हा संवाद साधताना पंतप्रधान मोदी हे जवानांमध्ये मोकळेपणाने मिसळून गेले होते. पंतप्रधान मोदी हे दरवर्षी सीमेवरच्या जवानांसोबत दिवाळी साजरी करतात. यातून पंतप्रधानांना भारतीय जवानांविषयी वाटणारा आदर प्रकट होतो. शत्रूंनी कुरापत काढली, आगळीक केली तर लष्कराला कारवाई करण्याचे सर्व अधिकार पंतप्रधान मोदी देतात. लष्कराच्या कारभारात, निर्णय प्रक्रियेत यत्किंचितही ढवळाढवळ न करणारा पंतप्रधान लाभणे हे कोणत्याही देशाचे भाग्यच असते. २००८ मध्ये मुंबई हल्ल्यानंतर लष्कराने पाकिस्तानवर हल्ला करण्याची परवानगी त्यावेळच्या काँग्रेस सरकारकडे मागितली होती. मात्र पडद्याआडून सरकार चालवणाऱ्या सोनिया गांधी यांनी त्यावेळचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांना पाकिस्तानवर हल्ल्याची परवानगी दिली नव्हती.



प्रत्येक हवाई योद्ध्याचे मी मनापासून कौतुक करतो, तुम्ही खरोखरच अद्भूत काम केले आहे.

दहशतवादाविरुद्ध भारताची लक्ष्मणरेषा आता अतिशय सुस्पष्ट झाली आहे. आता जर पुन्हा दहशतवादी हल्ला झाला तर भारत त्याला प्रत्युत्तर देईल, निर्णायक उत्तर देईल. आपण हे सर्जिकल स्ट्राईक दरम्यान, एअर स्ट्राईक दरम्यान पाहिले आहे आणि आता ऑपरेशन सिंदूर हे भारताचे नवीन सामान्य स्वरूप आहे. आणि मी कालही म्हटल्याप्रमाणे, भारताने आता तीन तत्वांवर निर्णय घेतला आहे, पहिले – जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर आम्ही आमच्या पद्धतीने, आमच्या अटींवर आणि आमच्या वेळेनुसार प्रत्युत्तर देऊ. दुसरे – भारत कोणताही आण्विक ब्लॅकमेल सहन करणार नाही. तिसरे म्हणजे, दहशतवादाला आश्रय देणारी सरकारे आणि दहशतवादी मास्टरमाईंड यात फरक केला जाणार नाही. जग भारताचे हे नवीन रूप, ही नवीन व्यवस्था समजून घेऊन वाटचाल करत आहे. ऑपरेशन सिंदूरचा प्रत्येक क्षण भारतीय सशस्त्र दलांच्या सामर्थ्याची साक्ष देतो. मी निश्चितपणे सांगतो की या काळात, आमच्या सैन्यांमधील समन्वय उत्कृष्ट होता. सेना असो, नौदल असो किंवा हवाई दल असो, सर्वांमध्ये समन्वय जबरदस्त होता. नौदलाने समुद्रावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सैन्याने सीमा मजबूत केली. आणि भारतीय हवाई दलाने हल्ला पण केला आणि बचावही केला. बीएसएफ आणि इतर दलांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. एकात्मिक हवाई आणि स्थल युद्धजन्य प्रणालींनी उत्तम कामगिरी पार पाडली आहे. आणि हीच एकता आता भारतीय सैन्याच्या सामर्थ्याची मजबूत ओळख बनली आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये, मनुष्यबळ आणि यंत्रांमधील समन्वय देखील आश्चर्यकारक राहिला आहे. अनेक लढाया अनुभवलेल्या भारताच्या पारंपरिक हवाई संरक्षण प्रणाली असोत, किंवा आकाशसारख्या आमच्या मेड इन इंडिया प्लॅटफॉर्म असोत, त्यांना एस–४०० सारख्या आधुनिक आणि शक्तिशाली संरक्षण प्रणालींनी अभूतपूर्व ताकद दिली आहे. एक मजबूत सुरक्षा कवच ही भारताची ओळख बनली आहे. पाकिस्तानच्या सर्व प्रयत्नांना न जुमानता, आमचे हवाई तळ किंवा आमच्या इतर संरक्षण पायाभूत सुविधांवर कोणताही परिणाम झाला नाही. आणि याचे श्रेय तुम्हा सर्वांना जाते म्हणूनच मला तुम्हा सर्वांचा अभिमान आहे, याचे श्रेय सीमेवर तैनात असलेल्या प्रत्येक सैनिकाला जाते, या ऑपरेशनशी संबंधित प्रत्येक व्यक्तीला जाते. आज आपल्याकडे नवीन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची इतकी क्षमता आहे की पाकिस्तान त्याच्याशी स्पर्धा करू शकत नाही. गेल्या दशकात, हवाई दलासह आपल्या सर्व दलांकडे जगातील सर्वोत्तम तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे. पण आपल्या सर्वांना माहित आहे की नवीन तंत्रज्ञानामुळे आव्हानेही तितकीच वाढतात. गुंतागुंतीच्या आणि अत्याधुनिक प्रणालींची देखभाल करणे, त्यांना कार्यक्षमतेने चालवणे, हे एक मोठे कौशल्य आहे. तंत्रज्ञानाला युक्त्यांशी जोडून तुम्ही दाखवून दिले आहे. या खेळात, तुम्ही जगात सर्वोत्तम आहात हे तुम्ही सिद्ध केले आहे. भारतीय हवाई दल आता केवळ शस्त्रांनीच नव्हे तर डेटा आणि ड्रोनच्या मदतीनेही शत्रूचा पराभव करण्यात पारंगत झाले आहे.

**(आदमपूर येथे हवाई तळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लष्कराच्या जवानांशी साधलेल्या संवादाचा संपादित अंश.)**

# पाकिस्तानचे नाक कापले



**● ब्रह्मोस क्षेपणास्त्राने ६ हवाई तळ उध्वस्त**
**● पाकची रडार प्रणाली उडवली, मग केला निर्णायक हल्ला**

> 'ऑपरेशन सिंदूर'च्या तिसऱ्या रात्री, ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानच्या ११ हवाई तळांवर कहर केला. सर्वाधिक दूरवरील ६ एअरबेसना सुखोई-३० एमकेआयअंतर्गत हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी लक्ष्य केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी हवाई दलाच्या अत्यंत सुरक्षित ठिकाणांना लक्ष्य करण्यासाठी आदल्या रात्रीच तयारी करण्यात आली होती. यासाठी, प्रथम शत्रूचे डोळे आणि कान मानल्या जाणाऱ्या रडार साइट्स नष्ट करण्यात आल्या.

लाहोरमधील कमांड अँड कंट्रोल सेंटरवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानी हवाई दल मोठ्या प्रमाणात असहाय्य झाले. पाकिस्तानी रडारच्या क्षमतेची चाचणी घेण्यासाठी डेकॉय ड्रोन लाँच करण्यात आले. यावरून हे सिद्ध झाले की शत्रूला हवाई संरक्षणावर लक्ष ठेवणे म्हणजे अंधारात बाण मारण्यासारखे आहे. पाकिस्तानचे बहुतेक रडार एकतर बंद होते किंवा हवाई दल त्यांना सक्रिय करण्यास घाबरत होते. हे संपूर्ण हल्ल्यासाठी परिपूर्ण होते.

### निश्चित तळांऐवजी तात्पुरत्या तळांवर तैनाती

हवाई दलाने शांत तळांवरून आपली संसाधने काढून ती तात्पुरत्या तळांवर तैनात केली. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरपर्यंत दरम्यान, पाकला संरक्षणात्मक तयारीसाठी १३ दिवस मिळाले होते. संसाधनांचे पुनर्वितरण करून, त्यांच्या गुप्तचर यंत्रणेला भ्रमित केले गेले.



## काश्मीर द्विपक्षीय मुद्दा, व्यापारावरही चर्चा नाही

भारताने पुन्हा एकदा स्पष्ट म्हटले की काश्मीर मुद्दा हा भारत–पाकमधील द्विपक्षीय मुद्दा आहे. मुद्दा पाकिस्तानने (पीओके) व्यापलेले भाग रिकामे करण्याचा आहे. या संघर्षात अण्वस्त्रे आणि व्यापाराबाबत कोणत्याही चर्चेला भारताने नकार दिला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थीचा दावा केल्यानंतर हे विधान आले आहे.

...अन् डीआयडी ऑपरेशन सुरू यानंतर ऑपरेशन 'डीआयएडी' सुरू करण्यात आले. म्हणजे शोधा... ओळखा... वाटप करा... नष्ट करा. एकदा हे चार बिंदू पूर्ण झाले की, ते लक्ष्य नष्ट करण्याचा संकेत होता. अशा परिस्थितीत, ब्रह्मोसने सुसज्ज सुखोई आणि स्कॅल्प आणि हॅमरने सुसज्ज राफेल लढाऊ विमाने पाठवण्यात आली. ब्रह्मोसने सहा पाकिस्तानी हवाई तळ उध्वस्त केले.

भारतीय हल्ल्याचा बदला म्हणून पाकिस्तानी सैन्य पश्चिम सीमेवर हल्ला करेल हे लष्कराला माहीत होते. अशा परिस्थितीत ४ स्तरीय एअर डिफेन्स ग्रीड सक्रिय केला. उंचावरील हल्ल्यांसाठी जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली एस–४००, मध्यम पल्ल्याच्या माऱ्यासाठी एमआर–एसएएम क्षेपणास्त्र प्रणाली बराक–८०० तैनात केली. कमी पल्ल्याच्या माऱ्याकरिता पिचोरा, ओसा, आकाश, स्पायडर आणि समर क्षेपणास्त्रांचे कवच बनवले. पॉइंट रेज येथे एल–७० आणि एलएलएडी संरक्षण प्रणाली तैनात केल्या. या ४ थरांच्या ढालीने पाकिस्तानचे ४०० ड्रोन नष्ट केले. ३० लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांना निष्क्रिय करण्यात आले. असे ४० ड्रोन देखील आले, जे सशस्त्र नव्हते. कदाचित हे हवाई संरक्षण कवच तपासण्यासाठी होते. पाकिस्तानचे लक्ष्य हवाई तळ होते. ही सर्व क्षेपणास्त्रे एअर शील्डने नष्ट केली. ■

### गोळीला गोळ्याने उत्तर द्या

**संरक्षण दल प्रमुख (CDS) अनिल चौहान, वायुदलप्रमुख, लष्करप्रमुख, नौदलप्रमुख, रक्षामंत्री, परराष्ट्रमंत्री, NS अजित डोवल आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांच्या उपस्थितीत काल लोककल्याण मार्गावरील पंतप्रधान निवासात आढावा बैठक झाली. या बैठकीत पंतप्रधान मोदी म्हणाले, 'तिकडून गोळी आली, तर इकडून गोळा टाका'! जेव्हा देशाचे पंतप्रधान आपल्या सैन्यप्रमुखांशी इतक्या ठामपणे आणि आत्मविश्वासाने बोलतात, तेव्हा त्यातून अगदी शेवटच्या सैनिकापर्यंत एक स्पष्ट संदेश जातो: संपूर्ण देश तुमच्या पाठीशी आहे! नेतृत्वाच्या या निर्भयतेमुळे सीमेवर उभ्या असलेल्या प्रत्येक सैनिकाच्या छातीत त्याने एक नवा जोश, एक नवा आत्मविश्वास संचारतो. तो सैनिकही मग शत्रूच्या छाताडावर चढून तांडव करायला तयार असतो. देशासाठी लढताना मागे उभं असलेलं निडर नेतृत्व सैनिकांना शंभर हत्तींचं बळ देतं!**

# होय, आम्हाला मोदी सरकारचा अभिमान आहे

> पहलगाम येथील हिंदू पर्यटकांच्या हत्येनंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे उत्तर दिले. या मोहिमेत पाकिस्तानच्या लष्करी तळांचे, एअरबेसचे प्रचंड नुकसान झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अण्वस्त्रांची धमकी देऊ नका, यापुढे कुरापत काढाल तर अद्दल घडवू, आता चर्चा फक्त पाकव्याप्त काश्मीरबरोबरच, इतक्या स्पष्ट शब्दात पाकिस्तानला इशारा दिला आहे. म्हणूनच मोदी सरकारचा आम्हाला अभिमान आहे.

**२६** नोव्हेंबर २००८ ते २९ नोव्हेंबर २००८ दरम्यान झालेल्या '२६/११' मुंबई दहशतवादी हल्ल्यात १६ देशांच्या ३४ परदेशी नागरिकांसह १७० नागरिकांची हत्या करण्यात आली होती, तर ८०० पेक्षा अधिक लोकं जखमी झाले होते. या दहशतवादी हल्ल्यात मुंबई पोलीस व भारतीय सुरक्षा दलांनी ९ दहशतवाद्यांना ठार मारले व उर्वरित एकाला, अजमल कसाबला जिवंत पकडले होते. हल्लेखोरांनी मुंबईतील २ फाईव्ह स्टार हॉटेल्स, १ हॉस्पिटल, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्टेशन आणि नरिमन हाऊस या ज्यू समुदायाच्या सेंटरला टार्गेट केलं होतं. या दहशतवाद्यांच्या पथकाचे 'इनडॉक्ट्रीनेशन' लष्कर ए तैयबाच्या संलग्न संघटनेच्या मुख्यालयात झाले होते. ती संघटना होती जमात-उद-दावा. लष्कर-ए-तैयबाच्या या १० प्रशिक्षित सशस्त्र अतिरेक्यांनी त्यांच्या मुरिदके कॅम्पसमधील छावण्यांमध्ये दीर्घकाळ गनिमी कावा व युद्ध प्रशिक्षण घेतले होते. २६/११ हे एक पाकिस्तानकडून करण्यात आलेले अतिशय नीच, संतापजनक कृत्य होते




ज्याची त्यांना शिक्षा झालीच पाहिजे असे तत्कालीन एअर चीफ मार्शल फली होमी मेजर यांचे ठाम मत होते. एवढा मोठा हल्ला पाहता, त्यांना खात्री होती की मनमोहन-सोनिया यांचे इंडीआघाडी सरकार पाकिस्तानला धडा शिकवणार. एक सैनिक म्हणून त्यांना आपल्या सरकारवर असा विश्वास असणे स्वाभाविक होते, म्हणूनच त्यांनी तयारीला सुरुवात केली. टार्गेटबद्दल सर्व माहिती भारतीय वायुसेनेकडे उपलब्ध होती. कोणती विमाने, कोणती शस्त्रे व इतर ऑपरेशनल गोष्टी अशा पद्धतीने तयार ठेवण्यात आल्या की सरकारने परवानगी दिल्यावर इतर एजन्सीज् व इतर सैन्यदलांशी समन्वय साधून केवळ १२ तासांत ते संपूर्ण ऑपरेशन पूर्ण करता येईल.

एकीकडे ही तयारी पूर्ण झाली आणि एअर चीफ मार्शल फली होमी मेजर यांना पीएमओमधून फोन आला! ठरलेल्या वेळी मिटिंग झाली. पंतप्रधान कार्यालयात मनमोहन सिंग, तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख आणि विशेष म्हणजे (तिकडे असू नयेत असे) पीएमओमधील काही अधिकारी पण या बैठकीत उपस्थित होते. सर्वांनी सर्व प्लॅन व वायुदल प्रमुखांकडे असलेली माहिती समजून घेतली व त्यांना 'कळवतो' असं सांगून परत पाठवले. ही बैठक २६/११ नंतर नोव्हेंबर २००८ मध्येच झाली होती. एअर चीफ मार्शल फली होमी मेजर त्यानंतर ६ महिन्यांनी ३१ मे २००९ रोजी निवृत्त झाले. त्या दिवसापर्यंत पीएमओमधून त्यांना याविषयी एकही फोन आला नाही.



आपल्या करियरच्या शेवटच्या दिवसापर्यंत ते २६/११ चा बदला घेण्यासाठी वाट पाहत राहिले. त्यांनी ही खंत नंतर बोलूनही दाखवली, ज्यात त्यांनी वरील सर्व पीएमओमधील घडामोडींचाही उल्लेख केला आहे.

'आज इंदिरा गांधी असती तर' म्हणणारेच तेंव्हा सत्तेत होते. त्याच इंदिराची सून आणि नातू त्यावेळी देशाचे पडद्याआडचे पंतप्रधान पण होते. 'जर इंदिरा गांधी असती तर' तिने जे केलं असतं, तेच या गांधी माय-लेकाने केले पद्धतशीर माती खाल्ली!

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने केलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पहिल्या फेरीमध्ये जमीनदोस्त करण्यात आलेल्या ९ दहशतवादी तळांपैकी जमात-उल-दावाचे मर्कज आणि लष्कर-ए-तोयब्बाचे हेडक्वार्टर असलेले मुरिदके शामिल होते. २६/११ चा सूड घेण्यात आला. २६/११ हल्ल्यात मारले गेलेल्या लोकांना न्याय आणि त्या लोकांच्या नातेवाईकांना 'सेन्स ऑफ क्लोजर' मिळायला १७ वर्षे लागली. ते महत्वाचे होतेच.

पण माजी एअर चीफ मार्शल फली होमी मेजर यांना जी आयुष्यभरासाठी खंत आतून खात होती, त्यांना त्यावेळी जे साध्य करायचे होते ते त्यांच्या रिटायरमेन्ट नंतर १७ वर्षांनी का होईना पण मोदींनी घडवून आणलेच!! १९९९ च्या IC ८१४ हायजॅकमधील सूत्रधार असोत की २००८ मधील २६/११ चे सूत्रधार, मोदींनी यावेळी बरेच जुने हिशोब चुकते केले आहेत. थोडा दम धरा, इंदिरा आणि नेहरू यांनी केलेल्या चुकांमुळे जे भोग आपल्या वाट्याला आले आहेत, त्याचे पण हिशोब मोदी करणार! ■

## काँग्रेसचा कांगावा

**'ऑपरेशन सिंदूर' काही काळ थांबवल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी मोदी सरकारवर टीका करणे सुरू केले. पाकिस्तानला नेस्तनाबूत करायला हवे होते, मोदी सरकारने उगाच माघार घेतली, १९७१ मधील युद्धामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांनी जसा कणखरपणा दाखवला तसा कणखरपणा नरेंद्र मोदींनी दाखवला हवा होता, अशी वक्तव्ये काँग्रेस नेत्यांनी केली. मात्र २००८ मधील मुंबईवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानला मनमोहन सरकारने का प्रत्युत्तर दिले नाही, या प्रश्नाचे उत्तर एकाही काँग्रेस नेत्याकडून मिळणार नाही. मुंबईवर एवढा मोठा हल्ला होऊनही मनमोहन सिंग सरकारने पाकिस्तानचा निषेध करण्याखेरीज काही केले नाही. १९७१ मध्ये शरण आलेल्या पाकिस्तानकडून इंदिरा गांधी यांनी पाकव्याप्त काश्मीर का परत घेतला नाही, या प्रश्नाचेही काँग्रेस नेत्याकडे उत्तर नाही. त्यावेळी पाकिस्तानपुढे शेपटू घालणाऱ्या काँग्रेस नेतृत्वाने आज कांगावा सुरू केला आहे.**

# सिंदूर मोहिमेत काय झाले?



● ४ प्रमुख दहशतवाद्यांचे हेडक्वार्टर उध्वस्त.

● डजनभर मोस्ट वॉन्टेड अतिरेकी ढगात, एकूण ५०० फूट-सोल्जर ठोकले आहेत.

● कंदहार पासून जुन्या हल्ल्यांतील सुत्रधारांचे आणि दहशतवाद्यांचे जुने हिशोब चुकते!

● सिंधू नदी करार इतिहासजमा.

● पाकिस्तान सैन्याची दाणादाण.

● पाकिस्तान वायुदलाची इज्जत धुळीस मिळवली.

● भारतीयांना आज गॅरंटी आहे की भारताची एयर डिफेन्स सिस्टीम त्यांची सुरक्षा करू शकते!

● जवळजवळ संपूर्ण युद्धच पाकिस्तानच्या भूमीवर खेळलो, म्हणजे जे झाले ते नुकसान त्यांचेच. पाक मिलिटरी इन्फ्रास्ट्रक्चरला मजबूत नुकसान.

● चीन फ्रंट उघडणार हा फुग्गा पण फुटला.

● बांगलादेश आणि आतील साप फणा काढणार हा पण फुग्गा ध्वस्त.

● भारतीय सेनेला आणि वायुसेनेला एकदम खराखुरा युद्धसराव करता आला. हा अनुभव प्रचंड उपयोगी पडणार आहे.

● पाकिस्तानी वायुदलाचे ८ तळ उध्वस्त.

● 'War of ttrition' चालावे आणि भारताची अर्थव्यवस्था खिळखिळी व्हावी यासाठी देव पाण्यात बुडवून बसलेल्या इकडच्याच नव्हे, तर जगभरातील झारीतील शुक्राचार्यांचा पोपट!

● पाकिस्तानच्या DGMO ने सिझफायरची भीक मागितली, अशी वेळ केवळ ७२ तासांत भारताने पाकिस्तानवर आणली.

● अजून अनेक गोष्टी आहेत, त्यावर सविस्तर लिहणार. पण सध्या एवढंच म्हणेन: आजपर्यंत भारतात नागरिकांवर झालेल्या कोणत्याही हल्ल्याला असा शानदार, जबरदस्त आणि १००% यशस्वी रिस्पॉन्स कोणत्याही सरकारने दिला नव्हता.

● २६/११ असो की मुंबईत झालेले बॉम्बस्फोट किंवा अजून कोणते हल्ले, एकही सरकारने अशी हिम्मत दाखवली नव्हती. म्हणून मला मोदी सरकारचा अभिमान आहे! ■

# रावळपिंडीपर्यंत ब्रह्मोसचा आवाज गेला: राजनाथ सिंग




> संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लखनऊमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र युनिटचे ऑनलाइन उद्घाटन केले. यावेळी त्यांनी पाकिस्तानला इशारा देत म्हटले की, आता दहशतवादी सीमेपलीकडेही सुरक्षित नाहीत, हे आम्ही जगाला दाखवून दिले आहे. यावेळी आवाज रावळपिंडीपर्यंत ऐकू गेला.

**भारतीय** सैन्याने आपले शौर्य दाखवले आहे. आम्ही कधीही त्यांच्या नागरिकांना लक्ष्य केले नाही. भारतीय सैन्याने शौर्य आणि धैर्यासोबत संयम दाखवला. भारतविरोधी आणि दहशतवादी संघटनांनी भारतमातेच्या शिरपेचावर हल्ला केला. अनेक कुटुंबांमधून सिंदूर पुसले गेले. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून लष्कराने न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. हे ऑपरेशन भारताच्या प्रबळ इच्छाशक्तीचे प्रदर्शन आहे.

आजचा दिवस खूप खास आहे. आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन आहे. १९९८ मध्ये आजच्याच दिवशी पोखरणमध्ये अणुचाचणी करण्यात आली. हा दिवस शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या कठोर परिश्रमाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. मला चांगलं आठवतंय जेव्हा मी म्हटलं होतं की








तुम्ही ते लवकरात लवकर पूर्ण करा. तुम्ही ते ४० महिन्यांत पूर्ण केले. आज आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करता हे आवश्यक आहे. यामागे मुख्यमंत्री योगी यांचे मोठे योगदान आहे. तुम्ही लोकांनी दिवसरात्र कष्ट केले. तुमच्या मेहनतीचे मी कौतुक करतो. जेव्हा आमच्या सरकारने उत्तर प्रदेशात संरक्षण कॉरिडॉरच्या दिशेने वाटचाल केली, तेव्हा उत्तर प्रदेशला एक मोठे उत्पादन केंद्र म्हणून विकसित करणे हे देखील एक उद्दिष्ट होते.

**ब्रह्मोस हा एक संदेश**

कानपूर हे उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. पण, नंतर तो मागे पडला. मी त्या कारणांमध्ये जाणार नाही. जर लखनऊने विकासाच्या त्या उंची गाठल्या तर ते पश्चिमेचे कानपूर म्हणून ओळखले जाईल. आता संरक्षण कॉरिडॉरमध्ये अधिक उपकरणे तयार केली जातील. यामध्ये मोठी गुंतवणूक करण्यात आली आहे. खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही क्षेत्रांचा सहभाग दिसून येतो. लखनऊमध्ये पीटीसीद्वारे टायटॅनियम सुपरप्लांट उभारण्याची चर्चा आहे. ब्रह्मोस हे जगातील सर्वात वेगवान सुपरसॉनिक क्षेपणास्त्र आहे. हे फक्त एक क्षेपणास्त्र नाही तर एक संदेश आहे. आज भारत जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्रांपैकी एक अब्दुल कलाम म्हणाले होते– जग दुर्बलांचा नाही तर शक्तिशालींचा आदर करते. आज भारत जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्रांपैकी एक आहे. आज सुरू होत असलेले हे केंद्र भारताला आणखी बळकटी देईल. भारताच्या स्वावलंबनाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल असेल. संरक्षण कॉरिडॉरमध्ये १८० सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यात ४००० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. हे भारताच्या नवीन नाविन्यपूर्ण उर्जेचे प्रतिबिंब देखील दर्शवते. उत्तर प्रदेश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर दरम्यान तुम्ही ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या सामर्थ्याची झलक पाहिली असेल आणि जर नसेल तर पाकिस्तानच्या लोकांना ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या सामर्थ्याबद्दल विचारा. दहशतवाद हे कुत्र्याचे शेपूट आहे, जे कधीही सरळ होणार नाही. ते प्रेमाची भाषा स्वीकारणार नाहीत. हे युनिट लखनऊमधील डिफेन्स कॉरिडॉरच्या भाटगावमध्ये ३०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले आहे. हे ब्रह्मोस एरोस्पेसने स्थापित केले आहे. यामुळे ३००० लोकांना रोजगार मिळेल. भारतीय हवाई दल आणि नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट असलेल्या निवडक सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांपैकी ब्रह्मोस हे एक आहे. योगी सरकारने डिसेंबर २०२१ मध्ये ब्रह्मोस प्रकल्पासाठी लखनऊमध्ये ८० हेक्टर जमीन दिली होती. हा प्रकल्प अवघ्या ३.५ वर्षात पूर्ण झाला आहे. ■


# जय जवान

● शेफाली वैद्य

> पाकिस्तानने जेट गमावले, त्यांचे दारुगोळ्याचे साठे उडवले गेले, नूर खानमध्ये अत्यंत कडेकोट सुरक्षा कवचाच्या आत असलेल्या त्यांच्या आण्विक तळावर मिसाईल हल्ला झाला, फक्त ९० मिनिटांच्या आत त्यांच्या ११ हवाई तळांवर हल्ले झाले, लाहोर, कराची, रावळपिंडी, भवाहलपूर अशा मोठमोठ्या शहरांवर भारताने हल्ले करून हे दाखवून दिलं की मनात आणलं तर पाकिस्तानमध्ये कुठेही भारत सहज घुसू शकतो.

**भारतीय** सेनेचा जो आदमपूर विमानतळ उध्वस्त करण्याचा दावा पाकिस्तानने खोटे फोटो दाखवून केला आणि तिथली एस ४०० एअर डिफेन्स प्रणाली उध्वस्त केल्याचे सांगितले, त्याच विमानतळाला पंतप्रधान मोदींनी रीतसर भेट देऊन, त्याच एस ४०० च्या पार्श्वभूमीवर तिथल्या वायुसैनिकांशी संवाद साधला आणि पाकिस्तानच्या खोट्या दाव्यांमधली हवा काढून घेतली. अर्थात पाकिस्तान मुळातच एक निर्लज्ज आणि दहशतवादी देश असल्यामुळे त्यांची कितीही जाहीर वस्त्रे उतरवली गेली तरी त्यांची भूमिका 'नंगेसे खुदा भी डरता है' अशीच असल्यामुळे त्यांना काहीही फरक पडत नाही.

पण हे काही मला धक्का देणारं नाही. पाकिस्तानचा स्वतःच्या खोटेपणावर प्रचंड विश्वास आहेच. कदाचित अनेक पिढ्या चुलत भावंडांमध्ये लग्न केल्यामुळे सतत मंदबुद्धी संतती निर्माण होत असल्यामुळे हे घडत असेल. पण इथे मुद्दा पाकिस्तानचा नाही. मला संताप येतोय तो काही स्वतःला भारतीय म्हणवणाऱ्या लोकांचा जे



स्वतःच्याच देशावर विश्वास ठेवायला तयार नाहीयेत.

हे तेच लोक आहेत, ज्यांनी तुमच्या माझ्यासारख्या पाकिस्तानच्या उध्वस्त हवाई तळांच्या त्याच प्रतिमा पाहिल्या आहेत. तुम्ही-मी जे आपले DGMO चे ब्रिफींग ऐकले तेच त्यांनीही ऐकले आहे, आपल्या लष्करातल्या अधिकाऱ्यांच्या आवाजातला शांत आणि ठाम आत्मविश्वास त्यांनाही जाणवलेला आहे, पाकिस्तानने केलेले ड्रोन हल्ले लीलया परतवतानाची भारताच्या आकाश एअर डिफेन्सची फुटेज त्यांनीही पाहिलेली आहे. तरीही ते हे मान्य करायला तयार नाहीत की ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने निःसंदिग्ध विजय मिळवलेला आहे!

**असे का?**

कारण त्यांना पुराव्याशी काही देणे घेणे नाही, त्यांना प्रॉब्लेम आहे तो मोदींशी आणि सामान्य भारतीयांच्या राष्ट्रभक्तीशी. मोदींचा आंधळा द्वेष करता करता ते कधी भारताचा द्वेष करू लागले आहेत ते बहुतेक त्यांनाही कळलेले नाही. आपल्या आसपास हे असे छिद्रान्वेषी, कुंठाग्रस्त लोक बरेच आहेत-ते कधी आपले कॉलेजमधले सहाध्यायी असतात, कधी शेजारी, कधी ऑफिसमधले सहकारी, तर कधी कधी, आपल्या दुर्दैवाने आपला एखादा नातेवाईक असा कर्मदरिद्री आणि करंटा निघतो.

त्यांचे पासपोर्ट भारतीय असतात, पण त्यांचा सडका मेंदू मात्र पाकिस्तानी असतो. मंदबुद्धी, न्यूनगंडांनी भरलेला, हिंदू द्वेषाने पछाडलेला. भारत कुठल्याही क्षेत्रात प्रगती करतो तेव्हा हे लोक कण्हत, कुंथत आपला



वैचारिक मूळव्याध कुरवाळत बसतात, मग ते चांद्रयान असो, राम मंदिर असो किंवा सध्या जगात चौथ्या क्रमांकावर असलेली भारताची अर्थव्यवस्था असो. हे लोक भारतातले पाकिस्तानचे एजंट असतात. पाकिस्तान जेव्हा उघडपणे खोटं बोलतो तेव्हा हे लोक त्याचं पुनःप्रसारण करतात. भारत जेव्हा पुराव्यानिशी सत्य सांगतो तेव्हा हे लोक शंका घेतात.

हे तेच लोक आहेत– जे बालाकोट एअर स्ट्राईकनंतर पुरावे मागत होते, जे ३७० कलम हटवणं हा प्रसिद्धी स्टंट म्हणत होते,जे राम मंदिराला राजकीय खेळी म्हणतात आणि हे तेच लोक आहेत जे कुठल्याही लढाईत जेव्हा भारत जिंकू लागतो तेव्हा 'सीझफायर'चे पोकळ सल्ले देतात.

ऑपरेशन सिंदूरनं फक्त पाकिस्तानमधले दहशतवादी तळ उध्वस्त केले नाहीत तर अशा लोकांनाही उघडं पाडलं. ऑपरेशन सिंदूरने जगाला दाखवून दिलं की हा अरेला कारे करणारा नवा भारत आहे, काँग्रेस काळातला 'हम देखेंगे, हम करेंगे' ची खोटी आश्वासने देणारा भारत नाहीये. ऑपरेशन सिंदूरनं पुराव्याने शाबीत करून दाखवलंय की आपल्याला आंतरराष्ट्रीय मान्यतेची गरज नाही आहे. आपल्यावर हल्ला झाला तर आपले प्रत्युत्तर नेहमीच संयमित, सौम्य आणि मुत्सद्दी असणार नाही.

ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी कारवाई नव्हती,

ती होती एक घोषणा–

भारतीय सैन्य सामर्थ्याची.

राजकीय इच्छाशक्तीची.

ऑपरेशन सिंदूर हे फक्त पाकिस्तानला दिलेलं प्रत्युत्तर नाही, ही कारवाई म्हणजे भारतातल्या प्रत्येक नागरिकाला दिलेलं आश्वासन आहे की आपण असहाय्य नाही. आपल्याला बीबीसीच्या संपादकीय सल्ल्याची गरज नाही. आपल्याला जग काय म्हणतंय ह्याच्याशी देणं घेणं नाही. आजचा भारत इतका कणखर आहे की घर में घुसके मारता है!

ऑपरेशन सिंदूरनं आपल्याला हेही शिकवलंय की लढाई फक्त सीमारेषेपलीकडे नाही.

लढाई इथेही आहे–भारतात, आपल्या अवती भवती

टीव्ही न्यूज रूममध्ये

युनिव्हर्सिटीच्या वर्गांमध्ये

इंस्टाग्रामवर युद्ध हे उत्तर नाही, म्हणणाऱ्या बिनडोक रील्स मध्ये,

ही लढाई आहे आपल्या कार्यालयांमध्ये ,

आपल्या हाउसिंग सोसायट्यांमध्ये,

आणि आपल्या कुटुंबाच्या व्हॉटस्अप ग्रुप्समध्येही.

ऑपरेशन सिंदूरनं आपल्याला अजून एक गोष्ट शिकवली आहे, सैनिक होण्यासाठी गणवेषच पाहिजे असं नाही. आज प्रत्येक भारतीय नागरिक हा नॅरेटिव्ह युद्धातला एक सैनिक आहे. आपले जवान बंदुकींनी लढतात, आपली शस्त्रे आपण तर्क, तथ्य, विवेक आणि निर्भयता असायला हवी. ऑपरेशन सिंदूर फक्त ही बॉम्ब, बंदुकी आणि क्षेपणास्त्रांनी लढली जाणारी लढाई नाही – ती आहे भारताची गोष्ट कोण सांगणार याची लढाई.

कारण जर आपण जगाला पुराव्यानिशी सांगितलं नाही की आपण चोख प्रत्युत्तर देऊन ही लढाई जिंकली, तर आपले हितशत्रू टपून बसलेच आहेत पाकिस्तानच्या खोट्याचे हस्तक बनायला.

म्हणून जेव्हा ते म्हणतात–पुरावे दाखवा,

आपण म्हणायला हवं–किती फोटो, व्हिडियो पाठवू?

जेव्हा ते म्हणतात–भारत आक्रमक आहे,

तेव्हा आपल्याला अभिमानाने सांगता यायला हवं, हो. आहे, बोला मग?

हे केवळ आपल्या शूर सैनिकांचे ऋण नाही,

ज्यांनी थेट शत्रूच्या प्रदेशात घुसून हल्ला केला

हे ऋण भारताच्या पुढच्या पिढ्यांचंही आहे आपल्यावर

कारण शांतता म्हणजे दुर्बलता नव्हे हे आपण सांगायला हवं. या पर्सेप्शनच्या युद्धात, सत्य हे शस्त्र आहे, स्मृती ही रणनीती आहे, आणि प्रत्येक ट्वीट, प्रत्येक पोस्ट, प्रत्येक आवाज जो भारताच्या अंतर्गत शत्रुंना एक्सपोज करतो, त्यांचे असत्य खोडून काढतो, तोच आहे तुमचा–माझा ऑपरेशन सिंदूर. ■

# महासत्तांच्या उरात धडकी भरवणारा 'आकाशतीर'...



● अभिजित जोग

शस्त्रास्त्रांच्या जागतिक बाजारावर प्रभुत्व असलेले अमेरिका, नाटो व चीन यांचे मिलिटरी-इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्सेस हादरले आहेत. याचं कारण ठरली आहे ऑपरेशन सिंदूर दरम्यान अजोड कामगिरी करणारी, ५-१० किलो स्फोटकं घेऊन जाणाऱ्या ड्रोन्सचे थवे (Swarms) सोडणारी, १००% भारतीय बनावटीची यंत्रणा, 'आकाशतीर', जी संरक्षण आणि आक्रमण दोन्हीसाठी अचूक लक्ष्यभेद करू शकते. हिच्या जबरदस्त कामगिरीमुळे शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठेत या महासत्तांसमोर भारताच्या रूपाने एक तगडा स्पर्धक उभा ठाकला आहे.

**या** यंत्रणेचं वैशिष्ट्य म्हणजे हिचं तंत्रज्ञान, उत्पादन, सुटे भाग, कार्य-नियंत्रण प्रणाली या सगळ्या गोष्टींची जबाबदारी ISRO, DRDO आणि BEL या सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांनी पेलली आहे. इस्रोच्या कार्टोसॅट व रिसॅट या उपग्रहांच्या लाईव्ह फीडचा वापर करणारी ही यंत्रणा, 'नाविक' या भारतीय जीपीएस प्रणालीच्या सहाय्याने अचूक लक्ष्यभेद करते. भौगोलिक आणि हवामानविषयक माहिती, शत्रूच्या रडारचे सिग्नल्स, सॅटेलाईट इमेजरी या सगळ्या माहितीचे I च्या सहाय्याने क्षणार्धात विश्लेषण करून ही प्रणाली आपले कार्य प्रभावीपणे

पार पाडते. या यंत्रणेमुळे 'नेक्स्ट जेन' तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रास्त्र निर्मिती करण्याची आपली क्षमता भारताने निर्विवादपणे सिद्ध केली आहे.

वेग, अचूकता आणि शत्रूच्या रडारला हूल देण्याचे कौशल्य यांच्या आधारे 'आकाशतीर'च्या ड्रोन्सनी पाकिस्तानमध्ये एकामागून एक अचूक लक्ष्यभेद करून हलकल्लोळ माजवला. अमेरिका, चीन आणि ड्रोन निर्मितीत आघाडीवर असलेल्या तुर्किये यांना 'आकाशतीर'ने मोठाच धक्का दिला आहे.

चिप्स, प्रोसेसर्ससह संपूर्ण भारतीय बनावटीची 'आकाशतीर' यंत्रणा म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'मेक इन इंडिया' योजनेचं झळाळतं यश आहे. मेक इन इंडियामध्ये संरक्षण उत्पादनावर विशेष भर दिल्यामुळे संरक्षण सिद्धतेबाबत भारत पूर्ण आत्मनिर्भर व्हावा या दिशेने मोठी प्रगती झाली आहे. २०१४-१५ मध्ये संरक्षण उत्पादनांची निर्यात केवळ रु.१९४५ कोटी इतकी होती. ती २०२३-२४ मध्ये रु. २१०८३ कोटी इतकी झाली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान अचूक लक्ष्यभेद करणाऱ्या 'आकाशतीर'ने केलेली चमकदार कामगिरी बघता २०२५-२६ साठी निर्धारित केलेल्या रु. ३०००० कोटींच्या लक्ष्यात मोठी वाढ होणार हे स्पष्ट आहे. यामुळेच या बाजारपेठेवर वर्चस्व असलेल्या महासत्ता अस्वस्थ आहेत.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली स्टेट बँक ऑफ इंडिया व एलआयसी यांनी इतिहासातील सर्वाधिक नफा कमावला तर इस्रो, डीआरडीओ यांनी कामगिरीचे नवे उच्चांक गाठले. योग्य नेतृत्व लाभले तर 'आजारी' मानले गेलेले सार्वजनिक क्षेत्रही सर्वोच्च दर्जाची कामगिरी करू शकते हेच नव्या भारताने दाखवून दिले आहे.

भारत I तंत्रज्ञानात मागे आहे... चीनचे ड्रोन तंत्रज्ञान श्रेष्ठ आहे... भारताकडे मात्र ड्रोन तंत्रज्ञानच नाही... मोदी सार्वजनिक क्षेत्राऐवजी आपल्या मित्रांना प्रमोट करतात... इ. इ. बाष्कळ बडबड करणारे राहुल गांधी आणि त्यांचे पप्पूपूजक चेले हे या कामगिरीमुळे अधिकच हास्यास्पद ठरले आहेत. ■



## एस-४०० प्रणाली आणि पर्रिकर

स्वतंत्र भारतातील पहिले भ्रष्टाचार प्रकरण ठरलेल्या नेहरू सरकारच्या संरक्षण दलासाठीच्या जीप घोटाळ्या पासून सोनिया गांधी सरकारच्या ऑगस्टा वेस्टलँड हेलिकॉप्टर व्यवहारापर्यंत आणि इंदिरा गांधी सरकारच्या एचडीडब्ल्यू पाणबुडी व्यवहारापासून ते राजीव गांधी सरकारच्या बोफोर्स घोटाळ्यापर्यंत, प्रत्येक संरक्षण खरेदीमध्ये काँग्रेस पक्षाने दलाली खाल्ली! अश्या भ्रष्टाचारात' आकंठ बुडालेल्या काँग्रेसने मात्र वाजपेयी सरकारच्या काळात जॉर्ज फर्नांडिस आणि मोदी सरकारच्या काळात मनोहर पर्रिकर यांच्या सारख्या अतिशय स्वच्छ, राष्ट्रनिष्ठ लोकांवरच भ्रष्टाचाराचे खोटे आरोप केले! प्रदीर्घ पण अतिशय निष्कलंक राजकीय जीवन जगलेल्या या लोकांनी आपल्या आयुष्यात कधी पाच पैशांचाही भ्रष्टाचार केला नव्हता. भारताने २०१४ नंतर 'मेड-इन-इंडिया' या मंत्राचा वापर करत देशातच अनेक शस्त्रे विकसित केली,जागतिक दर्जाच्या संरक्षण प्रणाली तयार केल्या, क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये (मिसाईल डेव्हलपमेंट) गरुडझेप घेतली आणि संरक्षण दलासाठी स्टार्ट-अप इकोसिस्टिम पण उभी केली. त्याव्यतिरिक्त, याच दशकात जे अनेक व्यवहार करण्यात आले, त्यात मनोहर पर्रीकर यांच्यामुळे राफेल आणि एस-४०० व्यवहार पण झाले होते. हे व्यवहार थेट दोन्ही सरकारमध्येच असल्याने त्यात कोणी दलाल नव्हतेच. दलाल नसल्याने या व्यवहारांत एक रुपया पण भ्रष्टाचार झाला नाही. ऑपरेशन सिंदूरमध्ये एस-४०० प्रणाली आणि ब्रह्मोस, राफेल यांची कामगिरी मोठी आहे. संरक्षण मंत्री म्हणून अल्प काळ काम पाहिलेल्या मनोहर पर्रीकर यांचे या मोहिमेवेळी स्मरण होणे अपरिहार्य होते. पर्रीकर यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

# पाकला धडा शिकवलाच, कायदेही मोडले नाहीत!



● डॉ. शैलेंद्र देवळाणकर, परराष्ट्र धोरण विश्लेषक

आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या चौकटीत राहूनच भारताने पाकिस्तानला धडा शिकवला आहे. कितीही कांगावा केला तरी त्यांना जागतिक सहानुभूती मिळणे कठीण आहे.

**जम्मू-काश्मीरच्या** पहलगाममधील बैसरन व्हॅलीमध्ये झालेला दहशतवादी हल्ला अत्यंत भीषण, नृशंस आणि तितकाच भेदक होता. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतरचा हा सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला होता. पुलवामामधील हल्ला हा लष्करी जवानांवर झाला होता; परंतु पहलगाममधील हल्ल्यामध्ये सर्वसामान्य नागरिकांना आणि विशेषतः पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यांच्या माध्यमातून पाकिस्तान भारताच्या सहनशक्तीची परीक्षा घेत आला आहे. पण भारताने आता आपल्या भूमिकेत बदल केला आहे. आजचा भारत बदललेला भारत आहे. या बदललेल्या भारताचे दर्शन पाकिस्तानला ६-७ मे च्या मध्यरात्री पीओके आणि खुद्द पाकिस्तानातील नऊ ठिकाणी भारताने केलेल्या हवाई हल्ल्यांच्या माध्यमातून घडले आहे.

पीओकेमध्ये जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा यांसारख्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनांचे अड्डे आहेत. या संघटना गेल्या दोन दशकांपासून भारतामध्ये विशेषतः जम्मू-काश्मीरमध्ये हिंसाचार घडवून आणत आल्या आहेत. त्यांना उध्वस्त करण्याचे कार्य सर्जिकल आणि एअर स्ट्राइकच्या माध्यमातून मागील काळात झाले. मात्र यावेळी भारताने पीओकेपर्यंत मर्यादित न राहता पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळही टार्गेट केले आहेत.

मागील कारवायांमध्ये भारताची लढाऊ विमाने एलओसी पार करून पाकिस्तानात घुसली होती. यावेळी आपण एलओसी पार न करताच शत्रूवर मारा केला आहे. यावरून भारताची लष्करी क्षमता, वायुदलाची सज्जता, आपली क्षेपणास्त्र क्षमता आणि आपल्या तोफगोळ्यांच्या माऱ्यातील अचूकता किती भेदक व आधुनिक आहे हे पाकिस्तानच्या लक्षात आले असेल.

भारताने केलेली कारवाई हा 'प्रिएम्प्टिव्ह अटॅक' आहे. संयुक्त राष्ट्रसंघही अशा प्रकारच्या हल्ल्यांना मान्यता देतो. याच आधारावर इस्राइलने हमासविरुद्ध, लेबनानविरुद्ध तसेच इराणविरुद्ध हल्ले केलेले होते. अमेरिकेने इराकमध्ये आपले सैन्य घुसवले होते त्यामागेही हीच सैद्धांतिक भूमिका होती. त्यामुळे 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताकडून कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्यांचा भंग झालेला नाही. कारण भारताने कोणत्याही देशावर हल्ला केलेला नाहीये. हा नॉन स्टेट क्टर्सवर केलेला हल्ला आहे. या ऑपरेशनमध्ये भारताने कुठेही सर्वसामान्य पाकिस्तानी नागरिकांना लक्ष्य केलेले नाही. तसेच पाकिस्तानी लष्कराच्या तळांवर हल्ला केलेला नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या चौकटीत राहून भारताने पाकिस्तानला धडा शिकवला आहे.

या हल्ल्यापूर्वी भारताने सर्व बाजूंनी पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच अमेरिका, रशियासह विविध देशांना आपली भूमिका कळवलेली होती. रशियासह अनेक देशांनी पहलगाममधील हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेधही केला होता. आता भारताच्या एअर स्ट्राइकनंतरही तुर्कस्तान आणि चीन वगळता एकाही देशाने पाकिस्तानच्या समर्थनार्थ भूमिका घेतलेली नाही. याचे कारण पाकिस्तान हा दहशतवादाची फॅक्टरी आहे, हे जगाला ज्ञात आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या भीषण हल्ल्याचा मास्टरमाइंड ओसामा बिन लादेनला याच पाकिस्तानच्या लष्कराने आश्रय दिला होता, हे अमेरिका जाणून आहे. त्यामुळेच भारताने केलेल्या एअर स्ट्राइकनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'हे अपेक्षितच होते' अशी प्रतिक्रिया दिल्याचे दिसले.

इस्लामिक देशांचा विचार करता यातील बहुतांश देशांचे आज भारतासोबत अत्यंत घनिष्ठ संबंध आहेत. पाकिस्तानला आजवर मदत करत आलेला सौदी अरेबियाही भारतासोबत व्यापारी आणि आर्थिक संबंध वाढवण्यावर भर देत आहे. पहलगामचा दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावरच होते. पाक पुरस्कृत दहशतवादाच्या मुद्द्यावर इराण नेहमीच भारताच्या भूमिकेशी सहमती दर्शवत आला आहे. मागील काळात पाकिस्तानला फिनान्शियल क्शन टास्क फोर्सच्या ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आले होते. त्यामुळे भारताच्या एअर स्ट्राइकनंतर पाकिस्तानकडून बराच कांगावा केला जात असला तरी त्यांना सहानुभूती मिळणे कठीण आहे. कारण प्रिएम्प्टिव्ह अटॅक हा भारताचा अधिकार आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेमध्ये व्हेटो पॉवर असणाऱ्या पाच देशांपैकी चीन वगळता इंग्लंड, फ्रान्स, रशिया आणि अमेरिका हे उर्वरित चारही सदस्य भारताच्या बाजूने आहेत. त्यामुळे सुरक्षा परिषदेत भारताचा निषेध करण्यासंदर्भात प्रस्ताव येऊच शकत नाही. हा भारताच्या कूटनीतीचा खूप मोठा विजय आहे. ■

# लोककल्याणाला समर्पित जीवन

● शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

> भारतभूमी वीरांची जननी आहे. तिने कायमच शूर-नायकांना जन्म दिला. थोर व्यक्तिमत्त्व आणि कर्तव्याप्रती भक्ती असलेल्यांसमोर जग नेहमीच झुकते. या धर्मभूमीवर जन्मलेल्या महाराणी अहिल्यादेवी होळकर या अशाच एक महान आणि तेजस्वी-गौरवशाली महिला होत्या, ज्यांनी आपल्या शिवसंकल्पाद्वारे सनातन परंपरा तसेच, विश्वासांनुसार आदर्श प्रशासन आणि राज्यव्यवस्था बसवली.



**मध्य** भारतातील माळवा राज्याची राणी राजमाता अहिल्यादेवी होळकर या भारतातील सर्वात दूरदर्शी महिला शासकांपैकी एक मानल्या जातात. त्यांचे जीवन आणि शासन लोककल्याणासाठी समर्पित होते. त्यांचे जीवन आणि प्रशासनाची शैली साधी आणि सोपी, धर्मनिष्ठ, न्याय्य, कल्याणकारी आणि संवेदनशील होती. लोकांनी त्यांना नेहमीच 'लोकमाता' म्हणून पाहिले. ब्रिटिश इतिहासकार जॉन केयस यांनी त्यांना 'फिलोसॉफर क्वीन' उपाधी दिली. यंदा अखंड भारत पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांची ३००वी जयंती साजरी करत आहे. हे औचित्य साधत अनेक सामाजिक संस्था आणि महिला संघटना त्यांच्या जयंती वर्षात त्यांच्या विविध गुणांवर प्रकाश टाकणारे कार्यक्रम आणि चर्चासत्रे आयोजित करत आहेत.

### राजयोग आणि कर्मयोगाचा संयोग असलेले व्यक्तिमत्त्व

महाराणीची राजवट ही प्रेम, न्याय आणि सुशासनाचे प्रतीक होती. एक महिला असूनही, त्या केवळ राज्य चालवण्यात निपुण नव्हत्या तर एक कुशल योद्धादेखील होत्या. त्यांनी बालपणीच सैन्य शिक्षण, घोडेस्वारी, शस्त्रे बाळगणे या कला अवगत केल्या. राघोबाच्या आक्रमणाच्या वेळी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी मुत्सद्देगिरीची सुरुवात करताना त्यांनी सिंधिया, भोसले, गायकवाड इत्यादींचे सहकार्य मागितले, जुन्या नातेसंबंधांच्या आधारे राघोबाला योग्य शिक्षा देण्यासाठी त्यांनी ५०० महिलांच्या सैन्याला प्रशिक्षणही दिले. राघोबाला लिहिलेल्या पत्रातून त्यांना असलेली राजनैतिक दूरदृष्टी उघड होते. पत्रात त्या लिहितात, तुम्ही मला अबला समजून राज्य हडप करण्यासाठी आले आहात. मात्र, माझी शक्ती रणभूमीवर समजेल. मी महिला सेनेसह तुमच्यासोबत झुंज देईन मी युद्धात हरले तरी कोणीही मला हसणार नाही किंवा तुमचे कौतुक होणार नाही. मात्र, जर तुम्हाला पराजय स्वीकारावा लागला, तर तुम्ही कुठेही तोंड दाखवू शकणार नाही. केवळ राघोबाच नव्हे, तर आपल्या राज्याच्या सीमेवर राजस्थानकडून उभ्या ठाकलेल्या आव्हानांना साहसाने सामोरे जात शत्रूला जिद्दीने पायदळी तुडविण्याचे महान कार्य पराक्रमी अहिल्यादेवींनी केले. त्यांनी लष्कर, सैनिकांवर वैद्यकीय उपचार इत्यादीही केले. आतापर्यंत आपण अहिल्यादेवी यांच्या धार्मिकतेबद्दल ऐकत आलो. परंतु त्या धाडसाने शत्रूचे दात घशात घालू शकतात, हे आपल्याला ठाऊक नव्हते. महाराणी अहिल्यादेवींची सत्ता

कठोर आणि न्याय्य होती. जात- पात, उच्च-नीच या भेदभावांच्या पलीकडे जाऊन प्रजेला चोरांपासून अभय मिळवून देणाऱ्या तरुणाशी त्यांनी आपल्या लेकीचे लग्न लावून दिले. पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेवर पूर्ण हक्कांची तरतूद आणि स्त्रीला दत्तक घेण्याचा अधिकार देणे यासारखे महिला सक्षमीकरणाचे निर्णय घेतले.

### महादेव आणि आई नर्मदा यांची सेवा करण्यासाठी महेश्वर राजधानीची स्थापना

राज्य चालविण्याचे अनेक सद्गुण असूनही, त्यांचे शासन मुळात धर्मनिष्ठ होते. आपल्या धर्माप्रती असलेल्या भक्तीमुळे राजधानी इंदूरहून पवित्र नर्मदा नदीच्या काठावरील महेश्वर येथे हलवली. राज्य चालवण्याबरोबरच त्या नर्मदा मातेची सेवा आणि पूजा करू शकतील, हा राजधानी महेश्वरला हलवण्याचा उद्देश होता. नर्मदा मातेच्या किनाऱ्यावरील राजवाडा हा सर्व त्याग करणाऱ्या तपस्विनीचा राजवाडा होता. ज्यामध्ये त्यांनी आपल्या आयुष्याची २८ वर्षे घालवली. महेश्वरला स्वावलंबन तसेच, शिक्षणाचे केंद्र बनवण्यासाठी महाराणीने विद्वान आणि धर्माचार्यांना आमंत्रित करून येथे संस्कृत शाळा सुरू केली. सेवा, त्याग, तपश्चर्या आणि दानधर्म यांचे महत्त्व वैयक्तिक जीवनात असताना, त्यांनी देवळांचा जीर्णोद्धार केला. त्यांची कायमस्वरूपी आर्थिक व्यवस्था केली. वाटसरूसाठी विश्रांतीची ठिकाणे आणि अन्नछत्रे उभारली. आपले राज्य शंकर भगवानांना समर्पित करून त्याचा प्रतिनिधी म्हणून राज्य केले. भगवान बद्रीनाथ, हिमालयातील केदारनाथ, दक्षिणेला रामेश्वरम, पश्चिमेला द्वारका ते पूर्वेला जगन्नाथ पुरीपर्यंत त्यांचे सुरू असलेले सेवाकार्य आजही प्रसिद्ध आहे.

### रणरागिणीचे वीर जीवन

वडील माणकोजीराव शिंदे आणि आई सुशीलाबाई यांच्या कुटुंबात दि. ३१ मे १७२५ रोजी चौंडी (अहमदनगर, महाराष्ट्र) मध्ये जन्मलेल्या अहिल्यादेवी यांचे जन्मगाव आता अहिल्यानगर म्हणून ओळखले जाते. धनगर जातीत जन्म झाल्यानंतर त्यांची प्रतिमा लक्षात घेऊन पेशवे बाजीराव तसेच मल्हारराव होळकर दोघांच्या परस्पर विचार-विनिमयानंतर अहिल्यादेवी यांचा विवाह मल्हाररावांचे पुत्र खंडेराव यांच्यासह करण्यात आला. युद्धात वीरगती प्राप्त झाल्याने अहिल्यादेवींना पतिवियोग सहन करावा लागला. त्यांना पतीच्या मृत्यूनंतर आपल्या सासऱ्यांच्या आग्रहास्तव राज्यकारभाराची जबाबदारी सांभाळावी लागली. सासरे मल्हारराव युद्धावर गेल्यानंतर महाराणी अहिल्यादेवी राज्याची धुरा कुशलतेने हाताळत. पत्रव्यवहाराच्या माध्यमातून मल्हाररावांना राज्याची बित्तंबातमी पाठविणे तसेच, प्रत्युत्तरात राज्य संचालनाकरिता सासऱ्यांचे मत, शिफारसी लक्षात घेणे, ही त्यांची नियमित प्रक्रिया होती. सेवा त्याचप्रमाणे रसद साहित्याची व्यवस्था, कर वसुली इत्यादी व्यवस्था मोठ्या निपुणतेने करत. त्यांनी आपल्या जीवनकाळात सासरे मल्हारराव होळकर, नातू (मुलीचा मुलगा) तसेच, मुलगी सर्वांचा अकाली मृत्यू पाहिला. या असहय्य वेदना सहन करत शूरपणे आणि धैर्याने वयाच्या ७० पर्यंत एक आदर्श राजमातेचे यशस्वी जीवन पूर्ण करत सन १७९५ मध्ये शेवटचा श्वास घेतला.

### आर्थिक विकासाचा दृष्टिकोन

अहिल्यादेवींनी आर्थिक विकासासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांपैकी एक म्हणजे महेश्वरी साडी, जी आजही जगप्रसिद्ध आहे. या उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी त्या स्वतः महेश्वरचे कपडे वापरत आणि देश-विदेशातून येणाऱ्या मान्यवरांना भेट म्हणूनही देत असत. त्यांनी नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मदत करण्याची आणि सैन्याच्या हालचालीमुळे झालेल्या पिकांसाठी नुकसान भरपाई देण्याचीही व्यवस्था केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंदूर येथील आपल्या भाषणात सांगितले की, मी देवी अहिल्यादेवींना नमन करतो आणि त्यांच्या सद्गुणांचे स्मरण करतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी प्रशासनात छोट्या गरजांना प्राधान्य दिले. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक अध्याय इतका प्रेरणादायी आहे की, येणाऱ्या पिढ्या त्यांच्याकडून शिकत राहतील. लोकमाता महाराणी अहिल्यादेवींच्या जीवनातून प्रेरणा घेऊन, त्यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त आपण त्यांनी दाखवलेल्या मार्गावर एकसंध, समृद्ध, सुसंवादी आणि शक्तिशाली भारत निर्माण करण्याचा आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगत जागतिक कल्याण करण्याचा संकल्प करुया! महाराणी अहिल्यादेवी होळकर यांना त्यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त ही खरी श्रद्धांजली ठरेल. ■

# भारतीय संस्कृती आणि परंपरांचा अभिमान जपणा-या अहिल्यादेवी

● **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

> पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या राज्य कारभाराने महिला कर्तृत्वाची पताका जगभरात फडकवली आहे. आज संयुक्त राष्ट्र ज्या उद्दिष्टांची चर्चा करते, ही जी शाश्वत विकासाची उद्दिष्टे ही ३०० वर्षापूर्वीच पुण्यश्लोक अहिल्यादेवींना ज्ञात होती. त्यांच्या राज्यामध्ये यातील प्रत्येक गोष्टींवर त्यांनी काम केलेले आपल्याला पाहायला मिळते.

**जसे** चांगले आरोग्य, लोककल्याण, दर्जेदार शिक्षण, लिंग समानता, स्वच्छ पाणी, आर्थिक वाढ, उद्योगातील वाढ आणि पायाभूत सुविधा, शाश्वत शहरे आणि समुदाय, जबाबदारीने वापर, उत्पादन, हवामान कृती, पाणी, शांतता, न्याय, मजबूत संस्था, ध्येयासाठी भागीदारी. उदाहरणासहित यातली प्रत्येक गोष्ट त्या काळात अहिल्यादेवींनी केली. पूर्वी त्या काळात जे काही कायदे, करपद्धती होत्या त्यामध्ये अहिल्यादेवींनी त्यांच्या राज्यामध्ये कर पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल केला. काही ठिकाणी त्याचे सुलभीकरण केले आणि गरीबांच्या हक्कांचे रक्षण करून प्रत्येक गावामध्ये त्यासंदर्भात त्यांनी पंच अधिकारी नेमले.

### मंदिरांचा जीर्णोद्धार

देशभरामध्ये परकीय आक्रमकांनी इथली संस्कृती नष्ट करण्याकरिता आपल्या श्रद्धास्थानावर सर्वाधिक आघात केला. सगळी श्रद्धास्थानेही ध्वस्त करण्याचे काम केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी या पहिल्या अशा राणी होत्या ज्यांनी केवळ स्वतःच्या राज्याचा विचार केला नाही. आसेतू हिमाचल याप्रमाणे संपूर्ण भारतामध्ये ज्या ज्या ठिकाणी आपली श्रद्धास्थळे नष्ट झाली होती त्या त्या ठिकाणी जाऊन त्या श्रद्धास्थळांचे पुनर्निर्माण केले. आज जे काशीचे नवीन मंदिर आहे पण त्याच्यावर औरंगजेबाने हल्ला करून ते तोडल्यानंतर त्याच्यावर मशीद बांधल्यानंतर पुन्हा त्याचे संवर्धन करून तिथेच एक मंदिर बांधायचे काम जर कोणी केले असेल तर ते अहिल्यादेवींनी केले. अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, ऋषिकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदयपूर, चौंडी या सगळीकडे त्यांनी मंदिरे बांधली आणि याशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णूपाद, महाकालेश्वर या सगळ्या मंदिरांचा जीर्णोद्धार अहिल्यादेवी होळकर यांनी केला. एवढेच नाही तर वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, जाम, त्रंबकेश्वर, नाशिक या सगळ्या ठिकाणी नदीला विस्तीर्ण घाट त्यांनी तयार केले. गोकर्ण, महाबळेश्वर, उज्जैनी, रामेश्वर, भीमाशंकर, या सगळ्या ठिकाणी त्यांनी अन्नछत्रे उघडली कारण त्या काळात मोठ्या प्रमाणात भाविक जायचे, गरीब लोकही जायचे त्यांच्याकरिता अन्नछत्रे उघडण्याचे काम अहिल्यादेवींनी केले.

आपला कणखरपणा देखील त्यांनी वेळोवेळी दाखवला त्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात असलेली जनता म्हणजे मध्य प्रदेशातील, उत्तर प्रदेशातील काही भागांमध्ये मंद्रूप सिंग नावाचा डाकू होता जो लोकांना त्रास द्यायचा, लोकं अहिल्यादेवींकडे गेले, आणि त्यांनी अत्यंत कणखर भूमिका घेऊन त्याला केवळ पकडलेच नाही तर फाशीची शिक्षा देण्याचे काम देखील अहिल्यादेवींनी केले. होळकरांची जी टांकसाळ होती त्याच्या नाण्यावर बिल्वपत्र आणि शिवलिंग यांची छाप होती. त्यांची जी धर्मश्रद्धा होती त्याला कुठल्याही प्रांताची मर्यादा नव्हती. म्हणूनच आसेतू हिमाचल त्यांचे नाव आजही घेतले जाते. त्यांनी धर्मशाळा, आश्रमशाळा, विद्वानांसाठी वेगवेगळ्या अध्ययनशाळा या सगळ्या गोष्टी बांधल्या. विशेषत: पाण्याचे महत्व वेळीच ओळखणाऱ्या अहिल्यादेवी होत्या. त्यामुळे पाण्याच्या सोयीकरता जलकुंडे, विहिरी, तलावांची निर्मिती केली. त्यांची कारकीर्द २८ वर्षांची होती. त्यांच्या २८ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यांच्या राज्यामध्ये एकदाही दुष्काळ पडलेला आपल्याला दिसत नाही. दुष्काळामुळे लोकं होरपळली आहेत, पिण्याचे पाणी नाही, शेतकरी होरपळला आहे असे पहायला मिळाले नाही. इतके उत्तम पाण्याचे नियोजन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज असतील किंवा अहिल्यादेवी असतील यांचे जे जलसंधारण आहे हे इतके प्रभावी आहे की आजही आपण जलयुक्त शिवार सारखी योजना राबवतो त्यावेळी त्या योजनांची प्रेरणा त्याठिकाणाहून आपल्याला मिळते. इतक्या मोठमोठ्या गडांवर, दुर्गांवर पुरेल एवढे पाणी साठवणे त्याचा योग्य साठा तयार करणे पावसाचा थेंब थेंब तिथे साठवला जाईल, असा प्रयत्न करणे या सगळ्या गोष्टी त्यांच्या माध्यमातून होताना आपल्याला पाहायला मिळतात.

### व्यवस्थापनशास्त्राचे धडे ज्ञात असलेल्या अहिल्यादेवी

व्यवस्थापनशास्त्राचे धडे देखील आपल्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्याकडून घेता येतील. योग्य कामाला योग्य माणूस निवडणे ही त्यांची हातोटी होती. बारीक सारीक सूचना असतील, चोख अंमलबजावणी स्वतः लक्ष देऊन त्या या सगळ्या गोष्टी करायच्या. मोहिमांचे काटेकोर नियोजन त्या स्वतः करायच्या. बंदुका आणि तोफांचे कारखाने त्यांनी सुरू केले. आणि त्या कारखान्यांच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीने बंदुका आणि तोफा कशा तयार करता येतील याचा प्रयत्न त्यांनी त्या काळामध्ये केला. वेगवेगळ्या दूरदूरच्या प्रदेशांमध्ये त्या छावण्या लावायच्या आणि त्यातून आपल्या मोहीमा पूर्ण करायच्या. त्यांचे जे व्यवस्थापन होते ते देखील अतिशय उत्तम प्रकारचे होते.

**'धर्मो रक्षति रक्षितः'** असे आपण म्हणतो याचे आपल्या कृतीतून कोणी काम केले असेल तर ते अहिल्यादेवींनी केले. आपली संस्कृती ही भोगापेक्षा त्यागावर उभी आहे, त्याच त्यागपूर्ण पद्धतीने त्यांनी संस्कृती आणि धर्माचे रक्षण केले हे आपल्याला पाहायला मिळते. पंढरपूरच्या विठुरायावर प्रत्येकाची श्रद्धा आहे. पण तो काळ असा होता की आक्रमणाचा काळ होता, अनेक अडचणी होत्या. ज्यावेळी अहिल्यादेवींच्या लक्षात आले की नैवेद्याची सोय करणेही कठीण जात आहे तर त्यांनी सांगितले की यापुढे नैवेद्याची सोय होळकर घराणे करेल आणि त्यांनी त्याकाळी विठुरायाच्या नैवेद्याची सोय स्वतःकडे घेतली आणि अनेक वर्षे ती चालली. हे सगळं करत असताना त्यांच्या राज्यात कुठलाही भेदभाव आपल्याला पाहायला मिळत नाही. आवश्यक असेल त्यावेळी त्या कठोर झालेल्या आपल्याला पाहायला मिळतात अन्यथा त्या मातेच्या भूमिकेत आपल्याला पाहायला मिळतात. या दोन्ही भूमिका अतिशय समर्थपणे त्यांनी निभावल्या. मल्हाररावांच्या निधनानंतर त्यांनी होळकरांची राजधानी इंदोरवरून महेश्वर येथे आणली. आपल्यापैकी कोणी महेश्वर येथे गेले असतील ते पाहू शकतात, किती आधुनिक पद्धतीने त्यांनी ते शहर वसवलेले आहे. अत्यंत सुंदर, वास्तु आणि स्थापत्यशास्त्र याचा संगम करून त्यांनी ते शहर वसवलं. जगभरातल्या चांगल्या कलावंतांना तिथे आणले जायचे त्यांना तिथे संधी दिली जायची. देशभरातले उत्तम विणकर त्यांनी महेश्वर येथे आणले आणि वस्त्रोद्योगाला चालना दिली. आजही महेश्वरची साडी ही जगप्रसिद्ध आहे. त्याची निर्मिती अहिल्यादेवी होळकरांनी त्या काळामध्ये सुरु केली.

जनसामान्यांची काळजी घेताना त्यांनी पशुपक्ष्यांसाठी जंगल, कुरणे, पाणवठे मोठ्या प्रमाणात तयार केले. अगदी मुंग्यांकरिता साखर ठेवण्याची पद्धत देखील त्यांनी त्या काळामध्ये सुरू केली. पाण्यातल्या माशांसाठी देखील खाद्य उपलब्ध करून दिले. अशा प्रकारची संवेदनशीलता आपल्याला त्यांच्यामध्ये पाहायला मिळते. विशेषत: झाडे

तोडण्याला बंदी असेल, मोठ्या प्रमाणात कुटीर उद्योग असतील याची सुरुवात देखील त्यांनी केली. त्यांच्या प्राणीप्रेमा संदर्भात एक गोष्ट सांगितले जाते जेव्हा अहिल्यादेवी लहान होत्या आणि आपले शौर्य सांगत होत्या. त्यावेळी मल्हारराव त्यांना म्हणाले, समोर झाडावर असलेल्या बुलबुल वर नेम धरून दाखव. त्यावर अहिल्यादेवी म्हणाल्या, 'तुम्ही मला दुसरं काहीतरी सांगा. बुलबुल तर आपला पाहुणा आहे. त्या बुलबुलने आपलं काय वाकडं केलं आहे? पाहुण्यांचा सन्मान करणे ही तर होळकरांची जीवनपद्धती आहे. त्यामुळे तुम्ही मला दुसरं काहीतरी सांगा, ज्यामध्ये जीव नाही असे काहीतरी लक्ष्य द्या. ज्यामध्ये मी तुम्हाला माझा निशाणा दाखवते.' अशाप्रकारे त्यांची प्राण्यांच्या बाबतीत संवेदना होती.

### थक्क करणारा जीवनप्रवास

त्या काळामध्ये अहिल्यादेवींनी हुंडाबंदी केली होती. हुंडा देणारा आणि घेणारा आणि मध्यस्थ या तिघांना देखील शिक्षा ठोठवत होत्या. त्यांच्या या कृतीमुळे जरब निर्माण झाली होती. हुंडा ही प्रथा त्याकाळी जवळपास बंद करण्याचे काम त्यांनी केले होते. खेड्यापर्यंत न्याय व्यवस्था त्यांनी नेली होती. मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे. महिलांनी सैनिकी शिक्षण घेतले पाहिजे. अशाप्रकारे सबल आणि आत्मरक्षण करू शकणाऱ्या आणि आपल्या समाजाचे आणि देशाचे रक्षण करू शकणाऱ्या मुली आणि महिला तयार करण्याचे काम त्यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जन्म आपल्याच महाराष्ट्रात चौंडीमध्ये सामान्य कुटुंबामध्ये झाला. पण आपल्या कर्तृत्वाने जी अहिल्या होती ती अहिल्यादेवी झाली, ती अहिल्यादेवी झाली, ती लोकमाता झाली आणि मग ती पुण्यश्लोक झाली. अशा प्रकारचा हा थक्क करणारा जीवनप्रवास आहे. अहिल्यादेवींच्या राज्यात एका धनाढ्य व्यक्तीचे निधन झाले. त्या व्यक्तीला पत्नी होती. तिला मुले नव्हती. तर तिथल्या एका सरदाराने कुठले तरी नियम सांगून सगळी संपत्ती सरकार जमा केली. ती विधवा स्त्री अहिल्यादेवींकडे गेली अहिल्यादेवींनी तिचा सत्कार केला. तिला त्या ठिकाणी सन्मान दिला आणि फर्मानच काढले की पतीच्या संपत्तीवर पत्नीचा पूर्ण अधिकार असेल आणि ती संपत्ती कोणीही जप्त करू शकणार नाही. त्यामुळे आज आपण जे कायदे बनवतो आपल्यालाही वाटते मागच्या काळात आपण एखादा नवा कायदा केला तर आपल्याला वाटते आपण किती सुधारणा केल्या, पण या सगळ्या सुधारणा अहिल्यादेवींच्या राज्यकारभारात आपल्याला पाहायला मिळतात.

### चाणाक्ष वृत्ती

त्या अतिशय चाणाक्ष होत्या. त्या लहान असताना पेशवे आणि मल्हारराव हे वेश बदलून फिरत होते. रस्त्यामध्ये त्यांची भेट अहिल्यादेवींशी झाली. त्यांनी त्यांच्याकडे पाणी मागितले. अहिल्यादेवींनी विचारले, तुम्ही कुठल्या गावचे पाहुणे? त्यावेळेस ते म्हणाले, आम्ही व्यापारी आहोत. अहिल्यादेवी हसायला लागल्या. मल्हाररावांनी त्यांना विचारले, का हसताय? त्यावर अहिल्यादेवींनी सांगितले की, व्यापारी घोड्यावर कधीच इतका ताठ बसत नाही आणि व्यापाऱ्याला कधीच झुपकेदार मिशा नसतात. तुम्ही व्यापारी नाहीत, तुम्ही सैनिक आहात, लढवय्या आहात. त्यामुळे तुम्ही नेमके कोण आहात ते सांगा. इतकी चाणाक्ष नजर अहिल्यादेवींची होती.

शस्त्रबळाने दुनिया जिंकणारे अनेक आहेत. पण शस्त्रबळाने आपले महत्व प्रस्थापित केल्यानंतर प्रेमाने जग जिंकणाऱ्या अशा अहिल्यादेवी आपल्याला दिसतात. विनोबा भावे यांनी त्यांच्याबद्दल बोलताना हेच म्हटलेले आहे, प्रेमाने व धर्मशक्तीने भारतातील सर्व प्रांतांना जिंकणारी अहिल्यादेवी ही एकमेव आहे. समकालीन दृष्टिकोनातून जर आपण त्यांच्याकडे बघितले तर काही महत्त्वाचे संदर्भ आहेत. त्या काळातील स्कॉटलंडची कवयित्री जेना बेली यांनी अहिल्यादेवी वर एक दीर्घ काव्य लिहिले. त्यात त्यांच्या गुणांचे यथायोग्य वर्णन केले आहे.

*"For thirty years her reign of peace,*
*The land in blessing did increase;*
*And she was blessed by every tongue,*
*By stern and gentle, old and young.*
*Yea, even the children at their mothers feet*
*Are taught such homely rhyming to repeat*
*"In latter days from Brahma came,*
*To rule our land, a noble Dame,*
*Kind was her heart, and bright her fame,*
*And Ahlya was her honoured name."*

**(मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला दिनानिमित्त विधानसभेत केलेल्या भाषणाचा संपादित अंश.)**

# लोकमाता !!

● चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि नेतृत्वगुणांनी युगानुयुगे प्रेरणा दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या अशा असामान्य व्यक्तिमत्त्वांपैकी एक होत्या. नेतृत्वगुण, सामाजिक सुधारणांबद्दलची तळमळ, धार्मिक सहिष्णुता आणि प्रशासकीय कौशल्य यामुळे त्या आदर्श आहेत.

**शिक्षणाची** पायाभरणी नेतृत्वगुणांच्या विकासाला कारणीभूत कशी ठरते, याचे जाज्वल्य उदाहरण म्हणजे, अहिल्यादेवी होळकर! वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी झाला. सासरे मल्हारराव यांनी त्यांना प्रशासकीय आणि सैनिकी कौशल्याचे धडे दिले, ज्यामुळे धाडस व नेतृत्वाला लोकमान्यता मिळाली. खंडेराव (१७५४), मल्हारराव (१७६६) आणि पुत्र मालेराव (१७६७) यांच्या निधनानंतर अहिल्यादेवींवर वैयक्तिक आणि राजकीय संकटांचा डोंगर कोसळला. परंतु, त्यांनी या दु:खांना बाजूला ठेवून स्वतःला होळकर संस्थानच्या नेतृत्वासाठी सिद्ध केले. त्यांनी पेशव्यांना विनंती करून स्वतः राज्यकारभाराची जबाबदारी घेतली, जे त्याकाळी स्त्रीने सत्तास्थान स्वीकारण्याचे दुर्मीळ आणि धाडसी उदाहरण होते.

### नेतृत्वगुण, धैर्य आणि दृढनिश्चय

अहिल्यादेवींच्या नेतृत्वाचा पहिला आणि महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांचे अतुलनीय धैर्य आणि दृढनिश्चय. त्याकाळी मराठा साम्राज्यातील राजकीय अस्थिरता, अंतर्गत कलह आणि बाह्य शत्रूंचा धोका यामुळे माळवा प्रांत संकटात




होता. अशा परिस्थितीत त्यांनी केवळ राज्याची सूत्रे हाती घेतली नाहीत, तर २८ वर्षे (१७६७-१७९५) अत्यंत यशस्वीपणे राज्यकारभार केला. त्यांनी सैन्याचे नेतृत्व केले आणि हत्तीवर स्वार होऊन युद्धभूमीवर आपली शौर्यगाथा रचली. त्यांचा दृढनिश्चय त्यांच्या सामाजिक सुधारणांमधूनही दिसून येतो. त्यांनी सतीप्रथेला विरोध केला. स्वतः सती जाण्याचा निर्णय मागे घेतला आणि समाजाला नवीन दिशा दिली. अशा प्रकारे, त्यांनी स्वतःच्या जीवनातूनच सामाजिक बदलांचा पाया रचला.

### प्रशासकीय कौशल्य आणि न्यायप्रियता

अहिल्यादेवीचे प्रशासकीय कौशल्य त्यांच्या नेतृत्वाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांनी महेश्वर येथे राजधानी स्थापून तिथे एक आदर्श प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली. त्यांनी नियमबद्ध न्यायालये स्थापन केली, जिथे प्रत्येक प्रकरणाची स्वतः सुनावणी घेऊन निष्पक्ष निवाडा केला जाई. मनरूपसिंहसारख्या कुख्यात डाकूला फाशी देऊन त्यांनी आपली कठोरता आणि न्यायप्रियता दाखवली. त्यांच्या काळात होळकर संस्थानात भिल्ल आणि गोंड आदिवासींशी संवाद साधून त्यांना पडिक जमिनी देऊन आणि कर वसुलीचा अधिकार देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. रस्ते, महामार्ग, तलाव, विहिरी आणि धर्मशाळा बांधून त्यांनी व्यापार आणि पर्यटनाला चालना दिली. त्यांनी मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला आणि सर्व जाती-धर्मांच्या लोकांमध्ये एकता निर्माण केली. त्यांच्या प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता



आणि प्रजेच्या अडीअडचणींशी संवाद होता, ज्यामुळे त्यांना 'लोकमाता' ही पदवी मिळाली.

### सुधारणावादी राज्यकर्ती

अहिल्यादेवी एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली. मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील-कुलकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर भागातून भिल्ल व गौड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून कर वसूल करत. तेव्हा त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्याकडून पडीक जमिनीची लागवड करून घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन कराराने देण्याची पद्धत सुरू केली.

अहिल्यादेवींनी १७७२ मध्ये राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलवली. तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. आहिल्यादेवींनी वस्त्रोद्योगास उत्तेजन दिले, कोष्ट्यांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची बाजारपेठ तयार केली. त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असता तरी राज्यकारभारात त्यांनी मनरूपसिंगसारख्या कुविख्यात डाकूला फाशी दिली. त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांतमर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतु हिमाचल घेतले जाते. अहिल्यादेवींनी अन्नछत्रे उघडती. राज्यातून विहिरी खोदून त्या चिरेबंदी बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा बांधल्या जनावरांसाठी डोण्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लगोलग उपचार व्हावेत म्हणून हकीम वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या बांधल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सढळ होता. गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करत, कपडे वाटत. मंडीच्या दिवसात धोंगड्या वाटल्या जात.

### अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार

अहिल्यादेवींनी प्रमुख तीर्थक्षेत्रे विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, ऋषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंडी येथे मंदिरे बांधली. याशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मलिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकालेश्वर आदी मंदिरांचा



वाराणसी येथील काशी विश्वनाथ धाम मंदिरात पुण्यश्लोक अहिल्यादेवींची ३०० वी जयंती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी रवींद्र किरकोळे, रामनारायण द्विवेदी आणि अहिल्यादेवींच्या वंशजांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.

जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंडी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैविनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. समपुरे–वार धामे या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे व धर्मशाळा बांधून यात्रिकरुंची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमीबाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.

### साधेपणा आणि करुणा

अहिल्यादेवींच्या नेतृत्वाला त्यांच्या वैयक्तिक गुणांनी अधिक समृद्ध केले. त्यांचा साधेपणा आणि सात्विक जीवनशैली यामुळे त्या प्रजेच्या जवळ राहिल्या. मध्यम उंची, मराठमोळी नऊवारी साडी आणि डोईवर पदर असे त्यांचे व्यक्तिमत्त्व भारतीय संस्कृतीचे प्रतीक होते. त्यांनी आपली खासगी संपत्ती मंदिरे, घाट आणि सामाजिक कार्यांसाठी दान केली. त्यांचा करुणामय स्वभाव त्यांच्या प्रजावत्सल धोरणांमधून दिसून येतो. त्यांनी गरीबांना सुखी करण्यासाठी आणि पीडित मानवतेची सेवा करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले.

अहिल्यादेवींचे नेतृत्वगुण आणि वैशिष्ट्ये आजही प्रासंगिक आहेत. त्यांचा निष्पक्ष प्रशासनाचा आदर्श, सामाजिक समतेची तळमळ आणि सर्वधर्मसमभावाची भावना ही आधुनिक नेतृत्वासाठी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यांनी दाखवलेली लिंगभेदाविरुद्धची लढाई आणि स्त्री सक्षमीकरणासाठीचे प्रयत्न आजच्या स्त्री–केंद्रित विकासाच्या संकल्पनांना पूरक आहेत. त्यांच्या धार्मिक सहिष्णुतेमुळे वेगवेगळ्या समुदायांमध्ये एकता निर्माण होऊ शकते, जे आजच्या ध्रुवीकृत जगात अत्यंत गरजेचे आहे.

महाराष्ट्र सरकारने अहिल्यादेवींच्या स्मरणार्थ अहमदनगरचे नामकरण 'अहिल्यानगर' केले आणि सोलापूर विद्यापीठाला त्यांचे नाव दिले. हा त्यांच्या कार्याचा गौरव आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित ३०० कार्यक्रमांमधून त्यांचे जीवन आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवले जाणार आहे, ज्यामुळे त्यांचा वारसा पुढे चालू राहील.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ एक शासक नव्हत्या, तर त्या एक द्रष्ट्या नेत्या, समाजसुधारक आणि प्रजेची खरी 'लोकमाता' होत्या. त्यांचे धैर्य, प्रशासकीय कौशल्य, सामाजिक सुधारणांचा वसा आणि सर्वधर्मसमभाव यांनी त्यांना भारतीय इतिहासात अजरामर केले आहे. त्यांचे नेतृत्वगुण आणि वैशिष्ट्ये आजच्या नेत्यांसाठी आणि समाजासाठी प्रेरणादायी आहेत. अहिल्यादेवींच्या जीवनातून आपण शिकले पाहिजे की, खरे नेतृत्व हे प्रजेच्या कल्याणात आणि सामाजिक समतेच्या प्रयत्नात आहे. ■

# सुशासनाचा आदर्श प्रस्थापित करणा-या अहिल्यादेवी

● रवींद्र चव्हाण, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष

भारतीय इतिहासात ज्या लोकोत्तर व्यक्तिमत्वांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचा अग्रक्रमाने समावेश होईल. सासरे आणि पतीच्या पश्चात आपले राज्य सांभाळताना अहिल्यादेवींनी शौर्य तर दाखवलेच, पण त्याच्या बरोबरीने अनेक निर्णयातून त्यांनी सुशासन कसे असते हे संपूर्ण भारताला दाखवून दिले.

**गोरगरीब,** वंचित, सामान्य जनतेसाठी आधार छत्र बनताना अहिल्यादेवींनी आपल्या धर्माचा, संस्कृतीचा अभिमानास्पद वारसा प्रकर्षाने जपला. त्यामुळेच अहिल्यादेवींचे नाव भारतीय इतिहासात गौरवाने घेतले जाते. मल्हारराव होळकर यांच्या प्रशासकीय व्यवस्थेत अहिल्यादेवींनी सुधारणा केल्या. खासगी आणि सरकारी खर्चाचा अत्यंत चोख हिशोब ठेवणाऱ्या अहिल्यादेवींनी आवश्यकता असेल तरच सरकारी तिजोरीतून पैसा खर्च केला. सरकारच्या हिशोबात एक कवडी जरी माझ्याकडे निघाली तर मी पाचकवडी देईन, एवढा विश्वास अहिल्यादेवींना आपल्या व्यवस्थेवर होता. होळकरांच्या राज्यांना पारंपरिक अर्थाने प्राकृतिक सीमा नव्हती. काही परगणे, माळवा, राजपुताना व नेमाड क्षेत्रात होते. मल्हारराव होळकरांच्या काळात राज्याचे उत्पन्न ७४ लाख रुपये एवढे होते. अहिल्यादेवींनी अनेक प्रशासकीय सुधारणा करत राज्याचे उत्पन्न सव्वा कोटी रु. पर्यंत वाढवले. भारतातील दूरदर्शी महिला शासक असा लौकिक मिळवलेल्या अहिल्यादेवींनी आपले जीवन



प्रजेच्या कल्याणासाठी समर्पित केले होते. धर्मनिष्ठ, न्याय्य, कल्याणकारी प्रशासन आणणाऱ्या अहिल्यादेवींना म्हणूनच 'लोकमाता' या बिरुदाने गौरविले जाते. पतीच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींना माळव्याची राणी म्हणून राज्य कारभाराची सूत्रे हाती घ्यावी लागली. १७६७ ते १७९५ या २८ वर्षाच्या काळात अहिल्यादेवींना बाह्य आक्रमणे आणि अंतर्गत अशांतता अशा आव्हानांना तोंड द्यावे लागले. अहिल्यादेवींच्या २८ वर्षाच्या कारभारात अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले गेले. अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील अनेक किल्ल्यांची डागडुजी केली. औरंगजेबाने उध्वस्त केलेल्या काशीविश्वनाथ आणि घृष्णेश्वर या मंदिरांच्या पुनर्बांधणीसाठी पुढाकार घेतला. अहिल्यादेवींचे प्रशासनीक कौशल्य, सक्षम राजकीय नेतृत्व, आर्थिक विचार आणि न्यायाचा आग्रह यामुळे त्यांच्या प्रजेला सुशासन लाभले. त्यांनी अनेक देवळांचा जीर्णोद्धार केला. शिवाजी महाराजांच्या आदर्श प्रशासनाचे प्रतिबिंब अहिल्यादेवींच्या कारभारात पडलेले दिसते. भारतीय जीवन मूल्यांच्या आधारे राज्य कारभार करणाऱ्या अहिल्यादेवींनी आपल्या जनतेवर कधीच कराचे ओझे लादले नाही. तसेच जनतेकडून जुल्मी पद्धतीने वसूलीही केली नाही. अनुशासन आणि न्याय या दोन तत्वांचा अंगीकार करत अहिल्यादेवींनी आदर्श प्रशासन कसे असते, याचा वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या सुशासनामुळे होळकरांच्या राज्याला कमालीची प्रतिष्ठा मिळाली.

आपल्या राज्यातील विणकर म्हणजे मारू समाजाला

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

सर्वार्थाने सहकार्य करून महेश्वर येथे वस्त्र उत्पादन सुरू केले. युद्धात प्राण गमावलेल्या राज्याच्या सैनिकांच्या पत्नींना विणकामाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या चरितार्थाला हातभार लागेल, अशी व्यवस्था तयार केली. यासाठी त्यांनी वाराणसी येथून विणकरांना आपल्या राज्यात बोलावले. गेल्या काही वर्षात महिलांचे बचतगट तयार झालेले आपण पाहत आहोत. यातून अनेक महिला स्वयंपूर्ण झाल्याचेही आपण अनुभवले आहे. मात्र अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी बचतगटाची संकल्पना प्रत्यक्षात आणली होती. यातून अहिल्यादेवींमधील दूरदर्शी शासकाची प्रचिती येते. त्या काळात शेती हेच अनेकांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. म्हणूनच अहिल्यादेवींनी शेती हा फायदेशीर व्यवसाय कसा बनेल, याकडे निग्रहाने लक्ष दिले. अहिल्यादेवींनी शेतकऱ्यांना आपला शेतमाल कोठेही विकण्याची परवानगी दिली. पशु-पक्ष्यांमुळे पिकाचे नुकसान होण्याच्या घटना नेहमीच घडतात. अहिल्यादेवींनी पशु-पक्ष्यांसाठी राखीव शेतजमीन ठेवण्याची कल्पना राबवली. याचा मोठा फायदा त्यांच्य राज्यातील शेतकऱ्यांना झाला. भूमीहीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी जमिन देऊन त्या जमिनीत वड, पिंपळ, आंबा, औदुंबरम, कवठ अशा जमिनीतील पाण्याचा साठा वाढवण्यास मदत करणाऱ्या झाडांची लागवड करण्यास सांगितले. शेतकऱ्यांने लावलेल्या २० झाडांपैकी ११ झाडांचे उत्पन्न सरकारकडे जमा करायचे आणि ९ झाडांचे उत्पन्न स्वत: घ्यायचे, असा नियम अहिल्यादेवींनी केला. यातून त्यांच्या सरकारचे उत्पन्न वाढले. गेल्या काही वर्षात रस्ते, पूल यासारख्या सार्वजनिक सुविधांची निर्मिती करताना जनता आणि खासगी सहभागाचे तत्व (पीपीपी- पब्लिक, प्रायव्हेट पार्टीसिपेशन) अंमलात आणले जात आहे. अहिल्यादेवींनी सरकार आणि जनता यांच्या सहभागाचे तत्व अंमलात आणले. पतीच्या अकाली निधनानंतर सती न जाता सतीत्वाचे व्रत अहिल्यादेवींनी आयुष्यभर जपले. सध्याच्या आधुनिक काळातही महिलांना त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, कुटुंबातील उत्पन्नावर अधिकार, वाटा मिळावा यासाठी झगडावे लागते. कमावत्या स्त्रीलाही आपल्या हक्काचा पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य नसते. अहिल्यादेवींच्या काळात तर महिलांवर अनेक सामाजिक आणि कौटुंबिक बंधने असत. त्यावेळच्या प्रथेनुसार ज्या विधवेला मूल-बाळ नसे तिची संपत्ती सरकारजमा होत असे. अहिल्यादेवींनी महिला आणि विधवांवरील असे जाचक निर्बंध काढून टाकले आणि महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा विचार प्रत्यक्षात आणला. त्यांनी विधवांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार प्रदान केला. त्याचबरोबर परंपरेने मिळालेल्या कौटुंबिक संपत्तीचा वापर आपल्या इच्छेनुसार करण्याचा अधिकार महिलांना दिला. या पद्धतीने महिला सक्षमीकरणाचे तत्व अहिल्यादेवींनी सर्वार्थाने सार्थ करून दाखवले. होळकरांच्या सरकारमध्ये जनतेकडून न्याय्य आणि उचित पद्धतीनेच कर घेतले जावेत, यासाठी त्या आग्रही होत्या. अहिल्यादेवींनी जनतेवरील अनावश्यक कर रद्द करण्यास मागे-पुढे पाहिले नाही. शेतातून किती पीक आले हे पाहून त्याच्या आधारावर कर आकारणी केली जात असे. एखाद्यावेळी दुष्काळ पडला तर करमाफी दिली जात असे. घरातील कर्त्या व्यक्तीचे आजारपण, लग्न समारंभ, युद्ध यासारख्या प्रसंगामध्ये जनतेच्या उत्पन्नावर होणारा परिणाम लक्षात घेऊन अहिल्यादेवींनी जनतेला सुलभ हप्त्यांमध्ये कर भरण्याची सवलत दिली होती. जनतेचा इतका बारकाईने विचार करणाऱ्या अहिल्यादेवींना म्हणूनच हयातीत 'लोकमाता'सारख्या अनेक पदव्यांनी गौरविले गेले. स्वत:साठी राज्याच्या तिजोरीतून एक पैसाही खर्च होणार नाही, याची दक्षता घेणाऱ्या अहिल्यादेवींनी आदर्श आर्थिक नियोजन कसे असते, हेही दाखवून दिले. स्वत:चे खर्च, खान-पिण्याचा खर्च, दान-धर्म यासारखे अहिल्यादेवींचे खर्च राज्याच्या तिजोरीतून होत नसत. खऱ्या अर्थाने धर्माधिष्ठित राज्य कारभार करणार्या अहिल्यादेवींनी मोठ्या शौर्याने घुसखोरांपासून आपल्या माळवा राज्याचे रक्षण केले. राघोबादादा पेशव्यांचे आक्रमण शिताफीने परतावून लावताना अहिल्यादेवींनी खंबीर शासकाचा प्रत्यय आणून दिला.

***'मला दुबळी समजलात का खुळी? दु:खात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू. आपली भेट रणांगणात! मला अबला समजू नका,'***

असा खलिता अहिल्यादेवींनी राघोबादादांना पाठवला होता. न्यायदानासाठी प्रसिद्ध असलेल्या अहिल्यादेवींनी यात्रेकरूंवर दरडोई एक कवडी कर लावून त्यातील काही पैसे यात्रेकरूंना लुटणाऱ्या भिल्ल आणि डाकूंना दिले. हे करताना यात्रेकरूंच्या संरक्षणाची जबाबदारी भिल्ल आणि डाकूंवर सोपविली. अशा अनेक लोकोपयोगी निर्णयातून सुशासनाचा आदर्श ठेवणाऱ्या अहिल्यादेवींना माझे विनम्र अभिवादन. ■

# सर्वार्थाने समर्पित कार्यकर्ता



**रामदासजी** माझ्यापेक्षा वयाने दोन-तीन वर्षांनेच लहान असतील, पण मी कधीही त्यांना केवळ 'रामदास' म्हणून हाक मारलेली आठवत नाही. नेहमी 'डॉक्टर' किंवा 'रामदासजी' असेच त्यांना संबोधले गेले. अभाविपचे विदर्भ प्रदेश संघटन मंत्री म्हणून जबाबदारी पार पाडत असताना, त्यांचा अकोला दौरा असायचा, तेव्हा लक्ष्मण स्मृती, संघ कार्यालय हेच त्यांचे निवासस्थान असे. माझेही मुख्यालय तिथेच असल्यामुळे आम्हाला अनेक क्षण एकत्र घालवता आले. दिवसभराच्या कार्यानंतर ते उशिरा परतत आणि मग गप्पांचा रंगतदार फड रंगायचा. त्यांच्या गप्पांमध्ये भरपूर अनुभव, विचार आणि कार्याची दिशा असे. कधीही फाजील बोलणे नसे.

कार्यालयातील प्रत्येकाशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. अगदी मोठ्या अधिकाऱ्यांपासून ते सामान्य प्रबंधकांपर्यंत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतील कार्यकर्ता ते प्रदेश संघटन मंत्री आणि पुढे पालक अशी त्यांची वाटचाल झाल्याने युवकांमध्ये त्यांचा सहज वावर होता. पुढे भाजपामध्येही त्यांनी आपल्या सुसंवादशील स्वभावाने आणि परिश्रमशील वृत्तीने युवकांचा भक्कम पाया उभा केला. पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांमध्ये भाजपाला क्रमांक एकचा पक्ष बनवण्यामध्ये रामदासजींचा सिंहाचा वाटा होता. ग्रामपंचायतींपासून ते अकोला, अमरावती महापालिका सत्तांपर्यंत त्यांनी पक्षासाठी अथक कार्य केले.

त्यांच्यासोबत काम करण्याचे मला भाग्य लाभले ते आधी पश्चिम विदर्भ विभाग संघटन मंत्री होते आणि नंतर महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस. त्यांनी कधीच कोणत्याही कामाला नकार दिला नाही. निवडणुका असोत की इतर काळ, त्यांचा प्रवास अविरत चालू असे. शास्त्रीय संगीत ऐकणे त्यांना विशेष आवडायचे आणि त्यांचे संकलनही समृद्ध होते. स्वतःही उत्तम गायक होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधून पुढे गडचिरोली-चंद्रपूर-वर्धा या मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्यावर त्यांचे लोकसंपर्काचे वर्तुळ अधिक विस्तारले. समाजातील सर्व थरांतील व्यक्तींना जोडणे, त्यांना वेळ देणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हे त्यांचे सहजस्वभावाचे अंग बनले होते. त्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतांना त्यांच्या शरीरावर ताण येत असे, पण त्यांनी कधीही त्याची तक्रार केली नाही. आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रकार्याला वाहून घेतलेले रामदासजी नियतीच्या क्रूर घावाला बळी पडले. त्यांच्या पश्चात पत्नी.. गीता वहिनी, मुले आणि असंख्य कार्यकर्ते पोरके झाले आहेत.

**रामदासजींच्या पवित्र स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.**

**■ रवींद्र भुसारी**

**संघटना,** कार्यकर्ता, माणूस व विचारधारेसाठी झटणारा, आपलं पूर्ण आयुष्य वेचणारा उत्तम कार्यकर्ता अशी ओळख असलेले माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर यांचं नुकतेच निधन झाले. अनेक दिवसांपासून डॉक्टर रामदासजी हे त्यांच्या किडनी संबंधित उपचारासाठी एम.जी.एम. हेल्थकेअर चेन्नई येथे उपचार घेत होते. संघटना आणि चळवळीसाठी रामदासजी एक मोठा आधार होते. त्यांच्या निधनाने राष्ट्रीय विचारांच्या चळवळीतला एक उत्तम संघटक कार्यकर्ता निघून गेला आहे.

रामदासजी स्वदेशी जागरण मंचचे कार्यकर्ते होते. आपण विदर्भाला पिंजून काढणारी स्वदेशी संघर्ष यात्रा काढली होती. कै. रामदासजींनी या यात्रेचे नेतृत्व केले होते. विदर्भातील सत्तर स्थानी रामदासजींनी प्रवास केला होता. भारतीय जनता पक्षात जबाबदारी आल्यावर देखील ते स्वतःस स्वदेशीचा कार्यकर्ता म्हणवून घेत.

**स्वदेशी जागरण मंचतर्फे मी कै. डॉ. रामदासजी आंबटकर यांना श्रद्धांजली अर्पण करतो!**

**हरीओम शांतीः।**

**■ धनंजय भिडे,**

**विदर्भ प्रांत पालक, स्वदेशी जागरण मंच**

# भाजपासाठी आयुष्य अर्पण करणारा कार्यकर्ता



**दक्षिण** महाराष्ट्रात विशेषतः कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर वाद जोरात सुरू असतानाच्या काळात ब्राह्मणी शिक्का असलेल्या जनसंघ आणि नंतर भाजपचे विचार इथल्या मातीत रुजवण्याचे काम अतिशय खडतर होते. कधीतरी हे विचार इथल्या सर्वसामान्य जनतेच्या मनात उतरतील अशा विचाराने झपाटलेल्या मूठभर कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करून भारतीय जनता पक्षाला मजबूत स्थितीत आणण्याचे काम प्रामाणिकपणे केले. त्यामध्ये बाबा देसाई यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल. बाबा देसाई यांच्या निधनाने भारतीय जनता पक्षाचा आणखी एक बिनीचा शिलेदार काळाच्या पडद्याआड गेला आहे.

भारतीय जनता पार्टी हा ४० ते ५० वर्षांपूर्वी कोल्हापुरातील महाद्वार रोड येथील वांगी बोळात मर्यादित होता. वांगी बोळामध्ये सर्वश्री वि. ना. सांगलीकर, सुभाष वोरा, श्रीपाद देशपांडे, प्र. द. गणपुले, वगैरे मंडळी रहात होती. बाबुराव जोशी, गोपाळराव माने, काका देसले, ज.गो. कुलकर्णी, वि. गो. कुलकर्णी, तसेच उद्योगपती तात्या तेंडुलकर, कृष्णराव सोळंकी, प्रफुल्ल जोशी, विजय तथा बाबा देसाई ही मंडळी शहराच्या इतर काही भागात राहत असली तरी भाजपा म्हणजे वांगी बोळ, आणि वांगी बोळ म्हणजे भाजप असे तेव्हा समीकरण होते. भारतीय जनता पार्टीची विविध मागण्यांसाठी जी आंदोलने व्हायची ती सुभाष वोरा आणि बाबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली. या आंदोलनात जेमतेम २०-२५ लोक सहभागी असायचे. त्यामुळे भाजपच्या आंदोलनाचे तेव्हा कुचेष्टा व्हायची. अशा आंदोलनातही फेरीवाले असायचे. अशा प्रतिकूल परिस्थितीत भाजप वाढवण्याचे काम बाबा देसाई वगैरेंनी केले. बाबा देसाई हे भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारणीवर कायमचे निमंत्रित सदस्य होते. पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे अतिशय निकटचे संबंध होते. बाबा देसाई यांच्या चिरंजीवाच्या विवाह सोहळ्यास गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री, विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी खास करून उपस्थित होते. तर प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्याशी त्यांची जवळीक होती. कोणताही राजकीय वारसा नसताना केवळ कर्तृत्वाच्या जोरावर संघर्षशील वाटचाल करत बाबा देसाई यांनी जिल्ह्याच्या राजकारणात वेगळा ठसा उमटविला. कष्टकरी, कामगारांच्या हक्कांसाठी चळवळीच्या माध्यमातून त्यांनी केलेले काम सर्वसामान्यांच्या मनात कायमचे राहिले आहे. भुदरगड तालुक्यातील पुष्पनगरच्या निवृत्त पोलिस हवालदार भाऊसाहेब देसाई यांचा मुलगा रविवार पेठेत वाढला. दिलबहार तालीम मंडळाच्या माध्यमातून सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. या काळात होणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमात बाबा सक्रिय असत. मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांनी 'आयटीआय'मधून शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर शाहू मिलमध्ये नोकरी करीत असतानाच कामगारांच्या प्रश्नावर आवाज उठविला. त्यांचा भारतीय मजदूर संघाचे मुकुंदराव गोरे, बाळासाहेब साठे यांच्याशी संपर्क आला. भारतीय मजदूर संघाबरोबरच जनता पार्टीचे काम सुरू केले. या काळात ते जनसंघाचे ज्येष्ठ नेते कै. गोपाळराव माने, दादासाहेब सांगलीकर व सुभाष वोरा यांच्या संपर्कात आले. भाजपातील विविध पदांवर तसेच भाजपा कामगार आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अशी पदे त्यांनी सांभाळली. कर्नल शंकरराव निकम, सुभाष वोरा यांच्यानंतर जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड झाली. प्रत्येक आंदोलनात बाबा देसाईंचा सहभाग ठरलेलाच. आंदोलनात त्यांनी तुरुंगवासही भोगला. प्रकाश जावडेकरांच्या नेतृत्वाखाली बेरोजगारांचा मोर्चा, शेतकरी कर्जमुक्ती आंदोलन, अयोध्या आंदोलन, काश्मीर बचाव आंदोलन, ३५६ कलमाचा दुरुपयोग विरोधी आंदोलन अशा अनेक आंदोलनांत त्यांनी मुंबई, दिल्ली, काश्मीर, अयोध्या, नागपूर आदी ठिकाणी सहभाग घेतला.

■ **महेश पाटील**

# महाराष्ट्र रेल्वे फाटक मुक्त करणार



**संपूर्ण** महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात रेल्वे ब्रिजचे काम महारेलनी हाती घेतले आहे. आतापर्यंत ३२ पूल महारेलनी पूर्ण केले आहेत, यावर्षी २५ पूल महारेलच्या माध्यमातून पूर्ण होणार आहेत. महाराष्ट्राला रेल्वे फाटक मुक्त करायचे आहे, त्या दृष्टीने महारेलकडे जबाबदारी दिली आहे. महाराष्ट्र रेल इनफ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट कॉर्पोरेशन, महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालय यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या रे रोड केबल स्टेड रोड ओवर ब्रिज व टिटवाळा रोड ओवर ब्रिजच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते, रे रोड केबल स्टेड ब्रिजचे काम अतिशय अडचणीच्या स्थितीत, वाहतुकीला कमीत कमी बाधा पोहोचवत, वाहतूक पूर्णपणे सुरू ठेवून हे काम महारेलने पूर्ण केले आहे. हे काम करत असताना उत्तम तंत्रज्ञान वापरून, गतिशीलतेने दर्जेदार काम पूर्ण केले आहे. पूल देखील एक आकर्षणाचे केंद्र असते, ते आपल्या शहराचे एक प्रकारे मूल्य वाढवणारी अशा प्रकारची एक वास्तू असते, हा विचार करून त्याच्यामध्ये विद्युत रोषणाईसह अन्य वेगवेगळ्या प्रकारे कामे करुन उत्कृष्ट वास्तु तयार केली आहे. नागपूरमध्येही महारेलच्या माध्यमातून अशा प्रकारचे १० पूल तयार झालेले आहेत, त्याचेही लोकार्पण लवकरच करणार.

### रे रोड केबल स्टेड ब्रिज

संत सावता माळी मार्गावरील रे रोड आणि डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानकांदरम्यान हार्बर लाईनवरील मध्य रेल्वेच्या मार्गावर रे रोड स्थानकाजवळ ६ लेनचा केबल स्टेड रोड ओवर ब्रिज आहे. हा महारेलद्वारे मुंबईतील पहिला केबल स्टेड रोड ओवर ब्रिज आहे.

### टिटवाळा रोड ओवर ब्रिज

कल्याण-इगतपुरी विभागातील टिटवाळा आणि खडवली रेल्वे स्थानकांदरम्यान कल्याण रिंग रोडवर टिटवाळा रेल्वे स्थानकाजवळ ४ लेनचा रोड ओवर ब्रिज आहे. ■

## मुंबई मेट्रो मार्ग-९ ची यशस्वी चाचणी



**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मिरा-भाईंदर, ठाणे येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या 'मेट्रो मार्ग-९, टप्पा-१, काशीगाव ते दहिसर (पूर्व) पर्यंत मेट्रोची तांत्रिक चाचणी' संपन्न झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रो मार्ग-९च्या मार्गिकेची तांत्रिक पाहणी केली व मेट्रोने प्रवास केला. मेट्रो मार्ग-९चा काशीगाव ते दहिसर (पूर्व) हा टप्पा या तांत्रिक चाचणीनंतर प्रवाशांसाठी सुरू होणार आहे. पश्चिम द्रुतगती मार्ग रहदारीमुक्त करून मुंबईकरांचा प्रवास अधिक सुखकर करण्यासाठी मेट्रो अत्यंत चांगले माध्यम आहे. पश्चिम द्रुतगती मार्गावर नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापासून वांद्रेपर्यंत 'सिमलेस कनेक्टिव्हिटी' करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे, ज्यासाठी विविध टप्प्यांवर काम सुरू आहे. या टप्प्यामध्ये एमएमआर क्षेत्रात पहिल्यांदा डबल डेकर ब्रिज तयार करण्यात आलेला आहे, ज्या माध्यमातून उड्डाणपूल आणि मेट्रो एकाच रचनेत दिसणार आहे. लवकरच विरारपर्यंत मेट्रोने प्रवास शक्य होणार आहे. विविध मेट्रो मार्गिका एकमेकांसोबत जोडल्यामुळे प्रवाशांना 'एंड टू एंड सोल्युशन' मिळेल. यासोबतच वाढवण येथे तयार होणाऱ्या बुलेट ट्रेनच्या स्थानकासोबत मेट्रोचे 'इंटिग्रेशन' करण्यासंदर्भात नियोजन सुरू आहे.

# घरकुल बांधकामासाठी मोफत वाळूची रॉयल्टी घरपोच मिळणार!

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

## आठ दिवसात रॉयल्टी घरपोच न मिळाल्यास तहसीलदार जबाबदार

**घरकुल** बांधकाम करणाऱ्या लाभार्थींना जवळच्या वाळू डेपोमधून वाळू देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांच्या माध्यमातून घरपोच रॉयल्टी पावती द्यावी, असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मंत्री बावनकुळे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यासाठी ३० लाख घरकुले दिली आहेत. या घरकुलांना मोफत वाळू देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारलेले आहे. मात्र, या घरकुलांना वाळू मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. यासाठी तहसीलदारांनी गटविकास अधिकारी यांची मदत घेऊन ग्रामविकास अधिकाऱ्यामार्फत सर्व घरकुल लाभार्थींना घरपोच वाळू रॉयल्टीची पावती पोहच करणे आवश्यक आहे. त्याची नोंदही ठेवण्यात यावी. यासाठी जिल्हाधिकारी यांनी पालकमंत्र्यांसोबत तर तहसिलदारांनी आमदारांसोबत बैठक घेऊन त्यांच्या मागणीनुसार वाळूची निर्गती करणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांनी आपल्या कामात कुठेही चूक करता कामा नये. महसूल संदर्भात यावेळी होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात एकही तक्रार येता कामा नये. तक्रार आली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करावी लागेल.

वाळू निर्गती धोरणाच्या अंमलबजावणीबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात वित्त व नियोजन, मदत पुनर्वसन राज्यमंत्री आशिष जैस्वाल, आमदार आशिष देशमुख, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेशकुमार यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

### ५० ठिकाणी नवीन क्रशर

कृत्रिम वाळूबाबतही धोरण आले असून, जिल्ह्यात




आता ५० ठिकाणी नवीन क्रशरला परवानगी द्यावयाची आहे. वाळू चोरी बंद करण्यासाठी अधिकारी घेत असलेल्या खबरदारीचेही त्यांनी कौतुक केले. तसेच महसूलच्या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यात कुठेही मागे पडणार नसून अधिकाऱ्यांवरील हल्ले खपवून घेणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. गौण खनिज धोरणाबाबतही एखाद्या व्यक्तीला घर बांधताना गौण खनिजाचे उत्खनन करावे लागले तर नकाशा मंजूर करतानाच त्याच्याकडून रॉयल्टी भरुन घेण्यात यावी अशा सचूनाही यावेळी करण्यात आल्या.

राज्यात सध्या १४० डेपो असून त्यापैकी ९१ डेपो सुरु आहेत. काही ठिकाणी वाळू चोरीच्या घटना घडत आहेत. दोन दिवसांपूर्वी जालना तहसिलदारांना गोळीबार करावा लागला आहे. अधिकाऱ्यांनी आपली कारवाई सुरुच ठेवावी. तसेच महसूल मंत्र्यांच्या सूचनेनुसार परिणामकारक आणि पारदर्शी कामकाज करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. ■

# मत्स्य व्यवसाय क्षेत्राला कृषी दर्जा

## सवलतीच्या दरात वीज पुरवठा, किसान क्रेडिट कार्ड



**राज्यातील** मच्छीमार, मत्स्यसंवर्धक यांना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्यासाठी मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा शासन निर्णय आज राज्य सरकारने जारी केला आहे. काही दिवसांपूर्वीच राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत याला मंजुरी देण्यात आली होती. राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या पाठपुराव्याने आणि पुढाकाराने मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा शासन निर्णय तातडीने जारी करण्यात आला आहे. १२ मे पासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. यामुळे राज्यातील मच्छीमार व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र हे कृषी प्रधान राज्य असून राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषी संलग्न क्षेत्रांवर जसे की पशुपालन, मत्स्यपालन, फळ फळावर, भाजीपाला या क्षेत्रांवर देखील मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. राज्यातील मत्स्यव्यवसायिकांचे हे योगदान लक्षात घेऊन मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी पाठपुरावा करत काही दिवसांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्यात आला होता. आज याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या शासन निर्णयामुळे राज्यातील मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्य उत्पादक, मत्स्य व्यवस्थापन, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्य बोटुकली संवर्धन करणारे घटक तसेच यामध्ये प्रतवारी, आवेस्टन, साठवणूक करणारे घटक अशा व्यक्तींना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक पायाभूत सोयीसुविधा व सवलती उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत घेतला होता. या निर्णयामुळे राज्यातील मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ होणार आहे तसेच स्थानिक पातळीवर मत्स्य व्यवसायाद्वारे रोजगारनिर्मितीत मोठा हातभार लागणार आहे. त्याकरताच राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या कृषी क्षेत्राला मिळणाऱ्या विविध सुविधा आणि सवलती या आता मत्स्य व्यवसाय क्षेत्रालाही या शासन निर्णयामुळे मिळणार आहेत.

या निर्णयामुळे मत्स्य शेतकरी, मत्स्य संवर्धन प्रकल्प यांना कृषी दराने सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड याचा लाभ दिला जाणार आहे. बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रानुसार अल्प दराने विमा संरक्षणाचा लाभही मत्स्य क्षेत्रात देण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सौर ऊर्जेबाबत ऊर्जा विभागातर्फे देण्यात येणारे लाभ यापुढे मत्स्य व्यवसायिकांना देण्यासही राज्य सरकारने मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे या शासन निर्णयात मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य व्यवसायिक, मत्स्यकास्तकार, मत्स्यबीज, मत्स्य बोटुकली संवर्धक, मत्स्य व्यवस्थापन अशा मत्स्य व्यवसायाशी संबंधित संज्ञांच्या प्रथमच सुस्पष्ट व्याख्या निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील मत्स्य उत्पादक त्याचबरोबर मत्स्य व्यवसायिक आणि त्यांच्याशी संलग्न असणाऱ्या कामगार क्षेत्राला या शासन निर्णयाचा मोठा लाभ मिळणार आहे. ■

# जनता दरबार



प्रदेश कार्यालयात महसूल मंत्री व प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनता दरबारमध्ये सामान्य नागरिकांबरोबरच पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही विविध समस्या, प्रश्नांबाबत निवेदने दिली.



प्रदेश कार्यालयात १३ मे रोजी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांच्या जनता दरबारचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रदेश समन्वयक सुधीर देऊळगावकर उपस्थित होते.



प्रदेश कार्यालयात गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या जनता दरबारचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रदेश समन्वयक सुधीर देऊळगावकर उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com